cmyk

## संपादकीय

### ...तर संशयाचे धुके अधिक गडद होतील!

तत्कालीन उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघातात झालेल्या मृत्यूनंतर अवघ्या काही दिवसांत राज्याच्या राजकारणात मोठी उलथापालथ झाली. मात्र, या अपघातानंतर उपस्थित झालेल्या विविध प्रश्नांना वेळीच आणि ठोस उत्तरे दिली गेली नाहीत, तर संशयाचे धुके अधिकच गडद होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

दैनिक www.epaper.rajyaloktantra.com

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–२८३ | मंगळवार दि.१० फेब्रुवारी २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## थोडक्यात...

### किशोरी पेडणेकर आता विरोधी पक्ष नेत्या

मुंबई : मुंबई महापालिका सभागृहात आता माजी महापौर विरोधी पक्ष नेत्याच्या भूमिकेत बघायला मिळणार आहेत. गेल्या ५० वर्षात महापौर पदी विराजमान झालेला विरोधी पक्षाच्या भूमिकेत दिसणार असल्यामुळे महापालिकेच्या इतिहासात नवा अध्याय लिहिला जाणार आहे. मुंबई महापालिकेमध्ये १९९७ पासून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे यांची सत्ता आहे. तसे बघायला गेले तर, १९९६ मध्ये शिवसेनेचा महापौर बसला. त्यानंतर सलग २०२२ पर्यंत शिवसेनेचा महापौर होता. तर आतापर्यंत विरोधी पक्षनेतेपदी काँग्रेस नगरसेवकांना सर्वाधिक संधी मिळाली आहे. महापालिकेत आतापर्यंत काँग्रेसचे विरोधी पक्ष नेते झाले आहेत. आता पहिल्यांदाच शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या माजी महापौर व ज्येष्ठ नगरसेविका किशोरी पेडणेकर विरोधी पक्ष नेत्याच्या भूमिकेत दिसणार आहेत.

### १३ फेब्रुवारीला संसद उडविण्याची धमकी

नवी दिल्ली: राजधानी दिल्लीतील ९ शाळांना सोमवारी सकाळी बॉम्बने उडवण्याच्या धमकीचे ई–मेल मिळाले. ई–मेलमध्ये दावा करण्यात आला होता की १३ फेब्रुवारी रोजी दुपारी १.११ वाजता संसदेत स्फोट होईल आणि दिल्लीला खालिस्तान बनवले जाईल. ई–मेलमध्ये दहशतवादी अफजल गुरु आणि पंजाबला खालिस्तान संबोधण्याचाही उल्लेख होता. धमकी मिळाल्यानंतर शाळांमध्ये सुरक्षा वाढवण्यात आली आहे. दिल्ली फायर सर्व्हिस नुसार, सकाळी वेगवेगळ्या भागांतील शाळांमधून आपत्कालीन कॉल आले. त्यानंतर अग्निशमन दलाचे बंब, बॉम्बशोधक पथक आणि श्वान पथक तात्काळ घटनास्थळी पोहोचले. डीएफएसच्या एका अधिकाऱ्याने सांगितले की, ९ शाळांना बॉम्बची धमकी मिळाल्याची माहिती मिळाली आहे. सर्व परिसरांची तपासणी करण्यात आली आहे.

### 'कुत्रामुक्त गाव'च्या नावाखाली कुत्र्यांची हत्या

हैद्राबाद : तेलंगणात कुत्रामुक्त गाव करण्याच्या नावाखाली राज्यातील सहा जिल्ह्यांमधील १२ हून अधिक गावांमध्ये अक्षरशः कुत्र्यांची कत्तल करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. जानेवारीपासून आतापर्यंत तब्बल १६०० हून अधिक भटक्या कुत्र्यांची निर्घृण हत्या करण्यात आल्याचे उघडकीस आले आहे. डिसेंबरमध्ये झालेल्या सरपंच निवडणुकीत अनेक उमेदवारांनी गावे कुत्र्यांपासून मुक्त करण्याचे आश्वासन दिले होते. हे आश्वासन पूर्ण करण्यासाठी आंध्र प्रदेशातून खास डॉग कॅचर्सला बोलावून, प्रत्येक कुत्र्यामागे ५०० रुपये देऊन त्यांना विषारी इंजेक्शनद्वारे मारण्यात आल्याचा गंभीर आरोप होत आहे.

### दहशतवादी अब्दुल रहमानची कारागृहात हत्या

फरीदाबाद : हरियाणातील फरिदाबाद कारागृहात बंद असलेला दहशतवादी अब्दुल रहमान याची हत्या करण्यात आली आहे. रविवारी रात्री उशिरा कारागृहात खून प्रकरणात बंद असलेल्या अरुण चौधरी उर्फ अब्बू जट नावाच्या कैद्याने त्याच्यावर धारदार वस्तूने हल्ला केला. दोघांनाही उच्च सुरक्षा असलेल्या बराकमध्ये एकत्र ठेवण्यात आले होते. हत्येची माहिती मिळताच कारागृह अधिकारी बराकमध्ये पोहोचले. त्यानंतर दहशतवाद्याचा मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आला. २० वर्षीय दहशतवादी अब्दुलला गुजरात एटीएसने मार्च २०२५ मध्ये पकडले होते.

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.९ फेब्रुवारी २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| किमान | कमाल | सरासरी |
| --- | --- | --- |
| गहू: ६६.०० क्विंटल | | |
| २,२५० | २,८५५ | २,५३९ |
| ज्वारी/हायब्रिड: ५१.५० क्विंटल | | |
| २,४७१ | ४,०५१ | ३,४०८ |
| मका/लोकल: ३.५० क्विंटल | | |
| १,५०० | १,५०० | १,५०० |
| तूर : ४३.०० क्विंटल | | |
| ६,२०० | ८,००० | ७,५४१ |
| उडीद : १.०० क्विंटल | | |
| ६,३०० | ६,३०० | ६,३०० |
| बाजरी: २४.५० क्विंटल | | |
| २,२०० | ३,२४० | २,७८१ |
| मुग: २.०० क्विंटल | | |
| ६,८०१ | ६,८०१ | ६,८०१ |
| सोयाबीन: ५४.०० क्विंटल | | |
| ५,३७० | ५,३८० | ५,३७३ |
| हरभरा: ५.५० क्विंटल | | |
| ५,५७१ | ५,५७१ | ५,५७१ |

# कोरडवाहू विकासासाठी 11.81 कोटींचा दुसरा हप्ता मंजूर

## राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत २०२५–२६ साठी निधी वितरणाला हिरवा कंदील

पुणे । प्रतिनिधी

**राज्य सरकारने राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत कोरडवाहू क्षेत्र विकास योजनेसाठी आर्थिक वर्ष २०२५–२६ मधील दुसऱ्या हप्त्याचा निधी वितरीत करण्यास सोमवारी (दि. ९) मान्यता दिली आहे. केंद्र व राज्य सरकारच्या संयुक्त सहभागातून एकूण ११ कोटी ८१ लाख ६६ हजार रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे.**



या योजनेसाठी राज्यस्तरीय मंजुरी समितीने यापूर्वीच २८ कोटी २२ लाख रुपयांच्या वार्षिक कृती आराखड्याला मंजुरी दिली होती. त्यानुसार पहिल्या टप्प्यात १४ कोटी ११.६७ लाख रुपये खर्च झाले असून, आता दुसऱ्या टप्प्यात केंद्र सरकारकडून ८ कोटी ४६ लाख रुपये प्राप्त झाले आहेत. त्यात राज्याचा ५ कोटी ६४ लाख रुपयांचा वाटा मिळून एकूण १४ कोटी १० लाख रुपये राज्याच्या तिजोरीत जमा झाले आहेत. या निधीतील काही रक्कम कृषी यांत्रिकीकरण उपअभियानासाठी वळवण्यात आली असून, उर्वरित निधी थेट कोरडवाहू क्षेत्राच्या विकासासाठी वापरण्यात येणार आहे. सर्वसाधारण प्रवर्गासाठी केंद्राचा ५ कोटी ७१ लाख व राज्याचा ३ कोटी ८०.६७ लाख असा मिळून ९ कोटी ५१.६७ लाख रुपयांचा निधी देण्यात आला आहे. अनुसूचित जाती प्रवर्गासाठी १ कोटी २८.३३ लाख, ▶▶ पान २ वर

# आजपासून बारावीच्या परीक्षेला सुरुवात



पुणे । प्रतिनिधी

राज्यात आजपासून बारावीच्या परीक्षेला सुरुवात होत आहे. ही परीक्षा १० फेब्रुवारी ते १८ मार्चदरम्यान होणार आहे. तर २० फेब्रुवारी ते १८ मार्च २०२६ या काळात इयत्ता दहावीची परीक्षा होणार आहे.

राज्यात यंदा १५ लाख ३२ हजार ४८७ विद्यार्थी बारावीची परीक्षा देणार आहेत. ३३८७ परीक्षा केंद्रावर ही परीक्षा पार पडणार आहे. यातील ७ लाख ९९ हजार ७७३ विद्यार्थी हे विज्ञान शाखेचे असणार आहेत. तर ३,८०,६९२ विद्यार्थी हे कला शाखेची परीक्षा देणार आहेत. तर ३,२०,१५२ विद्यार्थी वाणिज्य शाखेची परीक्षा देणार आहेत. किमान कौशल्य आणि आयटीआय टेक्निकल सायंन्सचेही काही विद्यार्थी ही परीक्षा देणार ▶▶ पान २ वर

# १२ जिल्हा परिषदांमध्ये भाजपच सर्वात मोठा पक्ष

## १२५ पैकी शंभरच्यावर पंचायतसमिती महायुतीच्या ताब्यात

मुंबई । प्रतिनिधी

**राज्यातील १२ जिल्हा परिषदांमध्ये भाजप सर्वात मोठा पक्ष पुढे आल्याचे दिसत आहे. १२ जिल्हा परिषदेत महायुतीचीच सत्ता येईल, हे स्पष्ट झाले आहे. १२५ पंचायत समित्यांचा कल पाहिला तर साधारणतः ५० समित्यांमध्ये भाजपची सत्ता येईल, अशी परिस्थिती आहे.**



जवळपास ७ ठिकाणी भाजप नंबर एकवर आहे. त्यात छत्रपती संभाजीनगर, सिंधुदुर्ग, सोलापूर, सांगली, धाराशिव, परभणी आणि सातारा या जिल्हा परिषदांचा समावेश आहे. शिवसेना रत्नागिरी आणि रायगडमध्ये दोन ठिकाणी नंबर एकवर आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पुण्यामध्ये नंबर एकवर आहे. जिथे तिन्ही पक्ष एकत्रित लढले, तिथे म्हणजे कोल्हापूर आणि लातूरमध्ये महायुतीच नंबर एकवर असल्याचे दिसते आहे. भाजपने २०१७ चा रेकॉर्ड तोडला आहे. त्यावेळी जिल्हा परिषदांमध्ये १४१ जागा मिळाल्या होत्या. आता घोषित झालेल्या निकालांमध्ये भाजपला ▶▶ पान २ वर

### "पुणे जिल्हा परिषदेवर अजितदादांच्या राष्ट्रवादीचा झेंडा

पुणे जिल्हा परिषदेचा निकाल जाहीर झाला असून, राष्ट्रवादी काँग्रेसने पुन्हा एकदा आपली सत्ता कायम राखली आहे. पुणे जिल्हा परिषदेत राष्ट्रवादी काँग्रेस सर्वात मोठा पक्ष ठरला असून दोन्ही राष्ट्रवादी गटांनी भाजप आणि शिंदे गटाला स्पष्टपणे मागे टाकले आहे. अजित पवार यांच्या अपघाती निधनानंतर सर्वच राजकीय पक्षांनी प्रचार थांबवला होता. मात्र या पार्श्वभूमीवरही पुणे जिल्ह्यातील मतदारांनी राष्ट्रवादी काँग्रेसवर ठाम विश्वास दाखवत स्पष्ट कौल दिला आहे.

### "सरकारच्या कामावर शिक्कामोर्तब – मुख्यमंत्री

नगरपालिका, महानगरपालिका, जिल्हा परिषद निवडणुकांतून महाराष्ट्र सरकारने केलेल्या कामावर जनतेने शिक्कामोर्तब केले आहे, हे मी स्पष्टपणे म्हणेन. या विजयाबद्दल रवींद्र चव्हाण यांचे अभिनंदन. विशेष म्हणजे सलग तिसऱ्या निवडणुकीत भाजप नंबर एकचा पक्ष बनला असल्याची प्रतिक्रिया मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे. महाविकास आघाडी फारसे कुठे दिसत नाही, असे ते म्हणाले.


# ऑनलाइन गेमिंगमुळे तरूणाला आला झटका!



मेरठ । वृत्तसंस्था

मेरठ येथून एक धक्कादायक घटना समोर आली आहे. ऑनलाइन गेम खेळत असताना अचानक प्रकृती बिघडल्याने २३ वर्षीय तरुणाचा मृत्यू झाला. कुटुंबीयांच्या माहितीनुसार गेम खेळताना त्याचा रक्तदाब अचानक वाढला आणि त्यानंतर त्याला डोकेदुखी व अस्वस्थता जाणवू लागली. काही वेळातच तो बेशुद्ध पडला. मृत तरुणाची ओळख मोहम्मद ▶▶ पान २ वर

# पीएम केअर संबंधित प्रश्न विचारण्यावर बंदी




नवी दिल्ली । वृत्तसंस्था

**काँग्रेसने सोमवारी दावा केला आहे की, संसदेत पीएम केअर फंड, पीएम राष्ट्रीय मदत निधी आणि राष्ट्रीय संरक्षण निधी संबंधित प्रश्न विचारले जाणार नाहीत. हे निर्देश थेट पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कार्यालयाने लोकसभा सचिवालयाला दिले आहेत.**

काँग्रेसने अहवालाला सोशल मीडिया प्लॅटफॉर्म वर शेअर करत हा दावा केला आहे. यात असे म्हटले आहे की, पंतप्रधान कार्यालयाने लोकसभा सचिवालयाला सांगितले ▶▶ पान २ वर

### निधीची नोंदणी होती 'धर्मादाय'कडे

हा निधी सार्वजनिक धर्मादाय विश्वस्त संस्था म्हणून नोंदणीकृत करण्यात आला होता आणि त्याची विश्वस्त संस्था नोंदणी (ट्रस्ट डीड) २७ मार्च २०२० रोजी नवी दिल्ली येथे करण्यात आली आहे. पीएम केअर फंडाच्या २०२२–२३ च्या पावत्या आणि देयके खात्याच्या अहवालानुसार, मार्च २०२३ च्या अखेरीस एकूण शिल्लक ६,२८३.७ कोटी रुपये होती. उर्वरित दोन निधी देखील पंतप्रधान कार्यालयाच्या नियंत्रणाखाली आहेत.

# राज्यात लवकरच एमपीएससी मार्फत ७० हजार पदांची नोकरभरती

## मुख्यमंत्री फडणवीस यांची माहिती

मुंबई । प्रतिनिधी

राज्यात लवकरच नोकर भरती प्रक्रिया नव्या पद्धतीने राबवली जाणार आहे. जवळपास ७० हजारांहून अधिक पदांची भरती टप्प्याटप्प्याने केली जाणार आहे. यामध्ये महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून सुमारे २० हजार पदे आणि महाराष्ट्र लोकसेवा आयोगाबाहेरील पदांचा समावेश असणार आहे. भरती प्रक्रिया राबविताना आवश्यक कौशल्ये, सेवा प्रवेश, पात्रता आणि कामाच्या स्वरूपानुसार निर्णय घेण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री अतिथीगृह येथे सेवा प्रवेश नियमावली सुधारणेसंदर्भात बैठक झाली. या बैठकीस मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्यासह ▶▶ पान २ वर

महाराष्ट्र लोकसेवा आयोग

# एसआयआरमध्ये अडथळा खपवून घेतला जाणार नाही!

## ममता बॅनर्जीच्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयाचा राज्यांना कडक इशारा



नवी दिल्ली । वृत्तसंस्था

मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षण प्रक्रियेत कोणत्याही प्रकारचे अडथळे खपवून घेतले जाणार नाहीत, असा कडक इशारा सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी सर्व राज्य सरकारांना दिला. पश्चिम बंगालमधील एसआयआर प्रक्रियेला आव्हान देणाऱ्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्या याचिकेवर सुनावणी करताना न्यायालयाने हे महत्त्वपूर्ण निरीक्षण नोंदवले. तसेच, पश्चिम बंगालमधील या प्रक्रियेची मुदत १४ फेब्रुवारीवरून आणखी एका ▶▶ पान २ वर

# राजीनामा दिल्यास पेन्शन देता येणार नाही

## वैद्यकीय कारणांमुळे दिलेल्या राजीनाम्यावर हायकोर्टाचा मोठा निकाल




चेन्नई । वृत्तसंस्था

**वैद्यकीय कारणांमुळे सेवेतून दिलेला राजीनामा पूर्वीची नोकरी गमावण्यास कारणीभूत ठरेल. राजीनामा आणि ऐच्छिक सेवानिवृत्ती यामध्ये स्पष्ट फरक आहे. वैद्यकीय कारणास्तव राजीनामा देणारा कर्मचारीदेखील पेन्शन लाभांसाठी पात्र असणार नाही असे महत्त्वपूर्ण निरीक्षण मद्रास उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती एस.एम. सुब्रमण्यम, न्यायमूर्ती डी. भरत चक्रवर्ती आणि न्यायमूर्ती सी. कुमारप्पन यांच्या खंडपीठाने नोंदवले.**

एखाद्या कर्मचाऱ्याने वैद्यकीय कारणास्तव राजीनामा दिल्यामुळे नोकरी गमावली, तर तामिळनाडू पेन्शन नियम १९७८ अंतर्गत पेन्शनसाठीच्या पात्रतेबाबत स्पष्टता आणण्यासाठी पूर्णपीठाची स्थापना करण्यात आली होती. मद्रास उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती एस.एम. सुब्रमण्यम, न्यायमूर्ती डी. भरत चक्रवर्ती आणि न्यायमूर्ती सी. कुमारप्पन यांच्या समावेश असलेल्या ▶▶ पान २ वर

### "राजीनाम्याबाबत सवलत नाही

सरकारी नियमांमध्ये आजारपणामुळे दिलेल्या राजीनाम्याबाबत कोणताही स्वतंत्र उल्लेख किंवा सवलत दिलेली नाही. जर नियमात 'वैद्यकीय कारण' समाविष्ट नसेल, तर न्यायालय स्वत:हून त्यात नवीन कारण किंवा आधार जोडू शकत नाही. जर नियमात आजारपणामुळे दिलेल्या राजीनाम्याला सवलत नसेल, तर न्यायालय ती सवलत देऊ शकत नाही, असेही उच्च न्यायालयाने स्पष्ट केले.

### "अर्थ बदलण्याची गरज नाही

न्यायालय स्पष्ट केले की या प्रकरणात कायद्याचा अर्थ बदलण्याची किंवा त्यात सुधारणा करण्याची गरज नाही, कारण नियम आधीच स्पष्ट आहेत. तामिळनाडू पेन्शन नियमावलीत 'वैद्यकीय कारणास्तव' पेन्शन देण्यासाठी आधीच स्वतंत्र नियम आहेत. त्यामुळे, राजीनाम्याशी संबंधित असलेल्या दुस–या नियमात ओढून–ताणून वैद्यकीय कारणाचा समावेश करण्याची गरज नाही. नवीन गोष्टी घुसवणे कायद्याने चुकीचे आहे.

cmyk

अग्रलेख

# ...तर संशयाचे धुके अधिक गडद होतील !

तत्कालीन उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघातात झालेल्या मृत्यूनंतर अवघ्या काही दिवसांत राज्याच्या राजकारणात मोठी उलथापालथ झाली. मात्र, या अपघातानंतर उपस्थित झालेल्या विविध प्रश्नांना वेळीच आणि ठोस उत्तरे दिली गेली नाहीत, तर संशयाचे धुके अधिकच गडद होण्याची शक्यता नाकारता येत नाही. हा संशय केवळ विमान अपघातापुरता मर्यादित राहिलेला नाही. अजित पवार यांच्या निधनानंतर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या संभाव्य विलीनीकरणाबाबत सुरू झालेल्या चर्चांनी राजकीय संभ्रम अधिकच वाढवला आहे. साहजिकच, विमान अपघातासंदर्भातील सर्व शंका चौकशी पूर्ण झाल्यानंतरच अधिकृतरीत्या दूर होतील. मात्र, तोपर्यंत सोशल मीडियावर आणि काही राजकीय वर्तुळात जाणीवपूर्वक पसरवल्या जाणाऱ्या अफवा आणि थियरीज वेळीच खोडून काढणे ही सरकारची जबाबदारी ठरते.

आज परिस्थिती अशी आहे की, कोणताही अपघात झाला की त्याला तात्काळ घातपाताचे स्वरूप देण्याचा प्रयत्न केला जातो. यावेळीसुद्धा सोशल मीडियावरील तथाकथित गुप्तहेर आणि हौशी तपासकर्ते विविध तर्क-वितर्क मांडत आहेत. शरद पवार यांनी स्वतः या अपघातामागे घातपाताचे कोणतेही कारण दिसत नसल्याचे स्पष्ट करूनही ही चर्चा थांबताना दिसत नाही. राज्यात संशयाचे वातावरण निर्माण करणे हाच या अपप्रचारामागचा मुख्य हेतू असल्याचे स्पष्ट होते. याहून गंभीर बाब म्हणजे काही जबाबदार राजकीय नेतेही या संशयात भर घालण्याचे काम करत आहेत. अजित पवार यांच्या विमान अपघाताची आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या कथित विलीनीकरणाची विनाकारण जोडणी केली जात आहे. १२ फेब्रुवारीला विलीनीकरणाची घोषणा होणार होती, असे दावे शरद पवार गटातील काही नेत्यांकडून सातत्याने केले जात आहेत. मात्र, विलीनीकरण झाल्यास एकत्रित पक्ष सत्तेत राहणार होता की सरकारमधून बाहेर पडणार होता, याचे उत्तर कुणाकडेही नाही. शिवाय, शरद पवार गटातील भाजपचे कट्टर विरोधक असलेले नेते हे विलीनीकरण मान्य करतील का, यावरही मौन बाळगले जात आहे. दुसरीकडे, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी आम्ही एनडीएचे घटक पक्ष आहोत आणि तसेच राहू, असे अत्यंत स्पष्ट शब्दांत सांगितले आहे. कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल यांनीही हाच सूर लावला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीदेखील अजित पवार यांनी अशा कोणत्याही विलीनीकरणाची कल्पना दिली नव्हती, असे स्पष्ट केले आहे. एवढे खुलासे होऊनही ही चर्चा जाणीवपूर्वक जिवंत ठेवली जात आहे, हे संशयास्पद आहे.

राजकीय वास्तव पाहता, देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील सरकार बहुमतात आहे. विधानसभा निवडणुकीनंतर भाजपचे बळ अधिक वाढले असून सत्तेसाठी त्यांना फारसा पाठिंबा लागणार नाही. अशा परिस्थितीत विलीनीकरणाची चर्चा सुरू ठेवून अजित पवार यांच्या गटातील कार्यकर्त्यांमध्ये संभ्रम निर्माण करण्याचाच प्रयत्न दिसतो. खरे तर, सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतल्यानंतर आणि कार्यभार स्वीकारल्यानंतर विलीनीकरणाच्या चर्चेला उरलेला अर्थच संपतो. तरीही गेल्या दहा-बारा दिवसांत विमान अपघाताबाबत संशय आणि विलीनीकरणाबाबत अफवा जाणीवपूर्वक पसरवल्या जात आहेत. म्हणूनच, सरकारने विमान अपघातासंदर्भातील सर्व शंका दूर करण्यासाठी पारदर्शक भूमिका घ्यावी आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने विलीनीकरणाच्या चर्चेला कायमस्वरूपी पूर्णविराम द्यावा. अन्यथा, राज्यात पसरलेले संशयाचे आणि संभ्रमाचे वातावरण अधिकच तीव्र होत राहील, आणि त्याची किंमत लोकशाहीला मोजावी लागेल.

# महानगरपालिकेत भाजपाची ऐतिहासिक सत्ता

## दानवेचा शब्द खरा ठरला, वंदना मगरे महापौर तर राजेश राऊत उपमहापौर



**जालना। प्रतिनिधी**

जालना शहराच्या राजकीय इतिहासात एक नवा अध्याय जोडला गेला असून जालना महानगरपालिकेच्या महापौरपदी श्रीमती वंदना अरुण मगरे तर उपमहापौरपदी राजेश राऊत यांची आज बिनविरोध निवड करण्यात आली. माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब पाटील दानवे व भास्कर आबा दानवे यांनी दिलेला शब्द खरा ठरला पाहिला महापौर भाजपचा होणार असे विश्वास जालना शहरातील जनतेला दिला होता ते विश्वास पूर्ण केला असे रावसाहेब दानवे यांनी सांगितले. या निवडीमुळे जालना महानगरपालिकेत प्रथमच भारतीय जनता पक्षाची भक्कम व दणदणीत सत्ता प्रस्थापित झाली आहे. जालना महानगरपालिकेच्या सभागृहात पार पडलेल्या या ऐतिहासिक निवड प्रक्रियेला भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते व माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब पाटील दानवे, आमदार बबनराव लोणीकर, आमदार नारायणराव कुचे, कैलास गोरंट्याल, भाजपाचे जालना शहर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांची प्रमुख उपस्थिती लाभली होती. या निवडीप्रसंगी जालना महानगरपालिकेत निवडून आलेले भारतीय जनता पक्षाचे सर्व ४१ नगरसेवक सभागृहात उपस्थित होते. उत्साहपूर्ण वातावरणात व कोणताही विरोध न होता महापौर व उपमहापौर पदासाठी बिनविरोध निवड जाहीर करण्यात आली. निवडीनंतर सभागृहात जल्लोषाचे वातावरण निर्माण झाले होते. देशाचे पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्र सरकारने देशभरात राबविलेल्या लोककल्याणकारी योजना, तसेच महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्य सरकारने केलेला सर्वांगीण विकास यामुळेच जनतेचा भारतीय जनता पक्षावर विश्वास दृढ झाला असल्याचे यावेळी बोलताना आमदार बबनराव लोणीकर यांनी सांगितले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जालना शहरात घेतलेली भव्य जाहीर सभा, तसेच महाराष्ट्राचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केलेली मेहनत आणि संघटनात्मक बांधणी यामुळेच जालना शहरात भाजपाला अभूतपूर्व यश मिळाल्याचेही त्यांनी नमूद केले. जालना महानगरपालिकेच्या निवडणुकीत ६५ पैकी ४१ जागांवर भारतीय जनता पक्षाचे उमेदवार विजयी झाले असून हा विजय केवळ उमेदवारांचा नसून पक्षाच्या प्रत्येक कार्यकर्त्याच्या कष्टाचा व निष्ठेचा आहे, असे प्रतिपादन आमदार लोणीकर यांनी केले. बूथ पातळीवर काम करणाऱ्या कार्यकर्त्यांपासून ते वरिष्ठ नेत्यांपर्यंत सर्वांच्या एकत्रित प्रयत्नातून हा ऐतिहासिक विजय मिळाल्याचे त्यांनी सांगितले. नवनिर्वाचित महापौर व उपमहापौर यांच्या नेतृत्वाखाली जालना शहराच्या पाणीपुरवठा, रस्ते, स्वच्छता, आरोग्य, शिक्षण, भूमिगत गटारी, स्मार्ट सिटीच्या धर्तीवरील विकास कामे तसेच मूलभूत नागरी सुविधा अधिक सक्षम करण्यासाठी ठोस नियोजन करण्यात येईल, असा विश्वास आमदार बबनराव लोणीकर यांनी व्यक्त केला. याप्रसंगी आमदार बबनराव लोणीकर यांनी जालना शहरातील सर्व मतदार, नागरिक, महिला, युवक तसेच भारतीय जनता पक्षाच्या सर्व कार्यकर्त्यांचे मनःपूर्वक आभार मानले. जनतेने दिलेल्या विश्वासाला पात्र ठरण्यासाठी भाजपाचे लोकप्रतिनिधी प्रामाणिकपणे काम करतील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

# सिने कलाकारांच्या टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेचे ना.पंकजा मुंडे यांच्या हस्ते उद्‌घाटन

**मुंबई । प्रतिनिधी**

**भामला फाऊंडेशनच्या वतीने हिंदी फिल्म आणि टी व्ही क्षेत्रातील सिने कलाकारांसाठी आयोजित करण्यात आलेल्या टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेचे उद्घाटन राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते आज मोठया उत्साहात करण्यात आले.**



बांद्रा येथील विंग्ज स्पोर्ट्स च्या मैदानावर या स्पर्धा भामला फाऊंडेशनतर्फे आयोजित करण्यात आल्या आहेत. आज सायंकाळी स्पर्धेचे उद्घाटन तसेच विजेत्या संघाला मिळणा-या चषकाचे अनावरण ना. पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते करण्यात आले. मुंबई महापालिकेचे आयुक्त भूषण गगराणी, अभिनेत्री शिल्पा शेट्टी, अभिनेते संजय दत्त तसेच हिंदी चित्रपट आणि टी व्ही सृष्टीतील अनेक नामवंत कलाकार यात सहभागी झाले होते. भामला फाऊंडेशनचे आसिफ भामला यांनी ना. पंकजाताई व पाहुण्यांचे स्वागत केले. ना. पंकजाताईंनी काही वेळ स्टेडियम मध्ये बसून पहिल्या मॅचचा आनंद घेतला.

# गुन्हा दाखल होत नसल्याने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन



**जालना । प्रतिनिधी**

**पुणेगाव ता .जालना येथील पारधी समाजाच्या महिलेस मारहाण प्रकरणी तालुका पोलीस स्टेशन कडून गुन्हा दाखल करण्यास पोलीस प्रशासनाकडून होत असलेल्या टाळाटाळीच्या निषेधार्थ पारधी समाज आणि वंचित बहुजन आघाडीच्या वतीने सोमवारी ( ता.०९) जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात आले. वंचित बहुजन आघाडीचे यांच्यासह शिष्टमंडळाने डीवायएसपी अनंत कुलकर्णी यांची भेट घेऊन झालेल्या चर्चेअंती दोन दिवसात गुन्हे दाखल करण्याचे आश्वासन दिल्याने आंदोलन स्थगित करण्यात आले.**

पुणेगाव येथील गायरान जमिनीवर पत्र्याच्या शेडमध्ये पारधी समाजाची महिला कुटुंबासह वास्तव्यास आहे .दि .२३ जानेवारी रोजी सायंकाळी ०६.०० च्या सुमारास गावातील काहीव इसम शेडमध्ये येऊन तुम्ही गायरान जमिनीवर राहु नका असे म्हणत त्यांनी महिलेस लाथा - बुक्या,काठीने मारहाण केली तसेच जीवे मारण्याची धमकीही दिली. तालुका पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करून घेण्यास पोलिसांनी नकार दिला.या निषेधार्थ गुन्हा दाखल करून पिडीत कुटुंबास पोलीस संरक्षण द्यावे या मागणीसाठी आंदोलन करण्यात आले.वंचित बहुजन आघाडीचे वतीने आंदोलनामध्ये सहभागी होत शिष्टमंडळासह उपविभागीय पोलिस अधिकारी अनंत कुलकर्णी यांची भेट घेतली.येत्या दोन दिवसांत गुन्हा दाखल करण्यात येईल असे आश्वासन कुलकर्णी यांनी दिल्यानंतर आंदोलन स्थगित करण्यात आले.तथापि दोन दिवसांत गुन्हा दाखल न झाल्यास वंचित बहुजन आघाडी तर्फे उपविभागीय पोलिस अधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात येईल असा इशारा देण्यात आला.

# णमोकार तीर्थ येथे उद्या भक्तीमय वातावरणात दीक्षा कल्याणक सोहळा

**बीड । प्रतिनिधी**

**णमोकार तीर्थ येथे सुरू असलेल्या भव्य पंचकल्याणक महोत्सवात उद्या, मंगळवारी 'दीक्षा कल्याणक' हा अत्यंत भक्तीमय आणि दिव्य वातावरणात साजरा होणार आहे. या पावन प्रसंगी भगवंतांचा राज्याभिषेक, त्यानंतरचा वैराग्य सोहळा व दीक्षाविधी संस्कार भाविकांना अनुभवता येणार आहेत.**

या दिवशी विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून सकाळपासून रात्रीपर्यंत श्रद्धा, भक्ती व अध्यात्माचा संगम अनुभवायला मिळणार आहे. सकाळी ६:३० वा. यज्ञशाळेत अभिषेक, शांतिहवन व जाप विधी, सकाळी ७:३० वा. मुख्य मंडपात अभिषेक, शांतिधारा व नित्य पूजा, सकाळी ९:०० वा. गणधराचार्य गुरुदेवांचे पूजन व मंगल प्रवचन, दुपारी १:०० वा. जन्मकल्याणक पूजा, ३२ राजांद्वारे राज्याभिषेक, राजतिलक व नीलांजनेचे नृत्य, त्यानंतर भगवंतांचा वैराग्य प्रसंग, दुपारी ३:०० वा. सरसंघचालक मोहन भागवत यांचे आगमन व धर्मसभा, सायंकाळी ४:३० वा. भगवान श्रींचा भव्य दीक्षाविधी संस्कार व पालखी सोहळा, रात्री ७:०० वा. महाआरती, शास्त्र प्रवचन व सांस्कृतिक कार्यक्रम, या मंगल व ऐतिहासिक सोहळ्यास मोठ्या संख्येने उपस्थित राहून धर्मलाभ घ्यावा, असे आवाहन णमोकार तीर्थ समितीच्या वतीने करण्यात आले आहे. ही माहिती प्रचारप्रसार संयोजक पारस लोहाडे, प्रसिद्धी प्रमुख विनोद पाटणी व राजेंद्र अजमेरा यांनी दिली.



# प्लॉटच्या वादातून व्यापाऱ्यास मारहाण

**जालना। प्रतिनिधी**

**चार वर्षापूर्वी विकलेल्या जालना शहरातील प्लॉट मालकीच्या वादातून ७ जणांनी प्रसन्नकुमार विनयकुमार कोठारी यांना ठोकलं ही घटना दुपारी १ ते ४ वाजेच्या दरम्यान घडली. याप्रकरणी ७जणांच्या विरोधात सदर बाजार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

यासंदर्भात सदर बाजार पोलीस ठाण्यातील सुत्रांनी दिलेली माहिती अशी की, प्रसन्नकुमार कोठारी (रा. शिवाजी महाराज पुतळ्याजवळ) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, त्यांच्या वडिलांच्या नावावर नवा मोंढासमोर सर्व्हे क्रमांक १८३ मध्ये जमीन होती. त्यापैकी ४ हजार ५५२ स्क्वेअर फूटचा एक प्लॉट दि. ५ एप्रिल २०२२ रोजी महेश सत्यनारायण चेचाणी यांना रितसर खरेदीखत करुन व प्रत्यक्ष ताबा देऊन विक्री करण्यात आला होता. त्यानंतर संबंधित प्लॉटला सिमेंट ब्लॉकचे कंपाऊंडही बांधण्यात आले होते. मात्र, अलीकडच्या काही दिवसांपूर्वी शिवाजी किंगरे नामक इसमाने हा प्लॉट आपला असल्याचा दावा केल्याने वाद निर्माण झाला. हा प्रश्न मोजणी करुन मिटवण्याचे ठरले होते. त्यानुसार दि. ६ फेब्रुवारी २०२६ रोजी दुपारी कोठारी इंटरनॅशनल ड्रीम स्कुलच्या कार्यालयात बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी शुभम सुरेंद्र चेचाणी, सात जणांवर गुन्हा दाखल अनोळखी इसमांनी श्री. कोठारी व त्यांच्या वडिलांना मारहाण करुन जीवे मारण्याच्या धमक्या देत चारचाकी वाहनाचे नुकसान केले. याप्रकरणी सदरबाजार पोलीस ठाण्यात आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहितेचे कलम ११५ (२), १२६ (२), १३१, १८९ (२), १९०, १९१, १९२, ३२४, ३५१, ३५२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक हे करीत आहेत.

## पान १ वरून...

### कोरडवाहू विकासासाठी ११.८१

तर अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी १ कोटी १.६७ लाख रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. केंद्राचा ७ कोटी ९ लाख आणि राज्याचा ४ कोटी ७२.६६ लाख असा एकूण ११ कोटी ८१.६६ लाख रुपयांचा निधी कृषी आयुक्तांच्या मार्गदर्शनाखाली विविध जिल्हास्तरीय प्रकल्पांसाठी वापरला जाणार आहे. या योजनेचा मुख्य उद्देश कोरडवाहू भागातील पिकांची उत्पादनक्षमता वाढवणे, मर्यादित जलस्रोतांचा शाश्वत वापर करणे आणि शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवणे हा आहे. आधुनिक तंत्रज्ञान, आवश्यक निविष्ठा व सिंचन सुविधांमुळे कोरडवाहू भागातील शेतीला नवी दिशा मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

-------------

### १२ जिल्हा परिषदांमध्ये

२३६ जागा मिळाल्या आहेत. भाजप हा नंबर एकचा पक्ष म्हणून स्थापित झालेला आहे. पंचायत समित्यांचा विचार केला तर २०१७ मध्ये भाजपला एकूण २८४ जागा होत्या. आता भाजपला ४१० जागा मिळाल्या आहेत. यामुळे भाजपने मोठी उडी मारली आहे. मित्रपक्षांनाही चांगल्या जागा मिळाल्या आहेत. १२५ समित्यांचा कल पाहिला तर साधारणतः ५० समित्या भाजपकडे असतील, २६ शिवसेनेकडे, २३ राष्ट्रवादी काँग्रेसकडे असतील. सात ते आठ काँग्रेसकडे, सात ते आठ शरद पवार यांच्या पक्षाकडे आणि पाच उबाठाकडे असतील, असे चित्र समोर येत आहे.

------------

### आजपासून बारावीच्या

आहेत. कोणताही विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहू नये म्हणून ३ फेब्रुवारीपर्यंत परीक्षेसाठी अर्ज स्वीकारण्यात आले. यंदा प्रत्येक जिल्ह्यासाठी दोन समुपदेशक नेमले आहेत. ते विद्यार्थ्यांना समुपदेशन करणार आहेत. बोर्ड स्तरावरही १० समुपदेशकांची नेमणूक करण्यात आली आहे. हे सर्वजण विद्यार्थ्यांच्या समस्या सोडवण्याचे काम करणार आहेत. काही पेपर सकाळी ११ वाजता आणि काही पेपर दुपारी ३ वाजता असणार आहेत. विद्यार्थ्यांना अर्धा तास आधी परीक्षा केंद्रावर उपस्थित रहावे लागणार आहे. विद्यार्थ्यांने त्यांचे हॉलतिकिट शाळेच्या लॉगिनवर उपलब्ध करून देण्यात आलेले आहे. याआधी ११ वाजता पेपर सुरू होण्यापूर्वी १० मिनिटांचा वेळ प्रश्नपत्रिका वाचण्यासाठी देण्यात येत होता. मात्र यंदा ११ वाजता पेपर सुरु झाल्यानंतर १० मिनिटे पेपर वाचन करण्यासाठी वेळ दिला जाणार आहे, परीक्षेच्या शेवटी हा वेळ जोडला जाणार आहे. हा यंदाच्या परीक्षेतील मोठा बदल असणार आहे. पेपर लीक होऊ नये म्हणून हा निर्णय घेण्यात आला आहे. दिव्यांग विद्यार्थ्यांना तासाला २० मिनिटे लेखणीक देण्यात येणार आहेत. कॉपीचा प्रकार टाळण्यासाठी प्रत्येक विद्यार्थ्यांना शपथ देण्यात आलेली आहे.

----------

### राज्यात लवकरच एमपीएससी

प्रशासनातील सर्व अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव तसेच सचिव उपस्थित होते. पुढे बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, राज्य प्रशासनातील महत्त्वाच्या विभागांकडे सर्वांगीण प्रशासन सुधारणा वेगाने राबवाव्यात याव्यात.मनुष्यबळ व्यवस्थापन आणि भरती प्रक्रियेतील पारदर्शकता याला प्राधान्य असेल. राज्य शासनाच्या सेवा प्रवेश नियमावली सुधारणेसंदर्भातील निर्णय लवकरच मंत्रिमंडळ बैठकीत घेतला जाणार असल्याचेही सांगितले. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, सामान्य प्रशासन विभाग हा केवळ औपचारिक नाही, तर शासनाच्या संपूर्ण भरती प्रणालीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आहे. राज्य शासनाच्या विविध विभागात ७० हजार पदे भरल्यानंतर विभागाच्या कार्यक्षमतेत भर पडणार आहे. भरती प्रक्रियेत अनावश्यक कागदपत्रे, लांब रांगा आणि विलंब टाळण्यासाठी ऑनलाईन व डिजिटल व्हेरिफिकेशन मॉडेल विकसित करण्यावर मुख्यमंत्री फडणवीस यांनी भर देण्याच्या सूचना केल्या.

--------------

### पीएम केअर संबंधित

आहे की संसदेत कोणताही सदस्य या निधींवर प्रश्न विचारणार नाही याची विशेष काळजी घ्यावी. यानंतर काँग्रेसने म्हटले आहे की, ही थेट हुकूमशाही आहे. संसदेचा अपमान आहे आणि खासदारांच्या अधिकारांवर हल्ला आहे. ३० जानेवारी रोजी पीएमओने लोकसभा सचिवालयाला कळवले की, तिन्ही निधींशी संबंधित प्रश्न आणि प्रकरणे लोकसभेच्या कार्यपद्धती आणि कामकाजाच्या नियम ४१(२) (५) आणि ४१(२)(७५) अंतर्गत स्वीकारार्ह नाहीत. पीएम केअर्स फंड २७ मार्च २०२० रोजी कोविड-१९ चा प्रसार झाल्यानंतर स्थापन करण्यात आला होता. त्याच्या अधिकृत वेबसाइटवर असे नमूद केले आहे की, कोविड-१९ साथीच्या रोगामुळे उद्भवलेल्या कोणत्याही प्रकारच्या आपत्कालीन किंवा कठीण परिस्थितीला तोंड देण्यासाठी आणि बाधित लोकांना मदत करण्याच्या मुख्य उद्देशाने, एका विशेष निधीची गरज लक्षात घेऊन- 'प्राइम मिनिस्टर्स सिटीजन असिस्टन्स अँड रिलीफ इन इमर्जन्सी सिच्युएशन्स फंड' या नावाने एक सार्वजनिक धर्मादाय ट्रस्ट स्थापन करण्यात आला आहे.

-------------

### ऑनलाइन गेमिंगमुळे

कैफ अशी आहे. तो बऱ्याच दिवसांपासून मोबाइलवर ऑनलाइन गेम खेळण्यात जास्त वेळ घालवत होता. घटनेच्या दिवशीही कानात इअरफोन लावून तो मोबाईलवर गेम खेळत होता. अचानक डोकं जोरात दुखू लागल्यानंतर तो जमिनीवर कोसळला. कुटुंबीयांनी तात्काळ त्याला जवळच्या रुग्णालयात दाखल केले. प्रकृती गंभीर असल्याने पुढील उपचारासाठी त्याला दिल्लीतील सफदरजंग रुग्णालयात हलवण्यात आले. तिथे दोन दिवस उपचार सुरू होते, मात्र डॉक्टरांना प्रयत्न करुनही जीव वाचवता आला नाही. रुग्णालयात दाखल करताना त्याचा रक्तदाब ३०० च्या पुढे गेला होता, ही अत्यंत धोकादायक पातळी आहे. डॉक्टरांनी मृत्यूचे कारण मेंदूत रक्तस्राव (ब्रेन हेमरेज) असल्योचे सांगितलं आहे. नातेवाईकांचे म्हणणे आहे की, कैफला गेमिंगची इतकी सवय लागली आहे, याची त्यांना पूर्ण कल्पना नव्हती. परिसरातील नागरिकांच्या मते तो अनेकदा तासन्‌तास मोबाइलवर गेम खेळत बसलेला दिसायचा. याबाबत डॉक्टरांनी इशारा दिला आहे की, सतत स्क्रीनकडे पाहणे, ताणतणाव, झोपेचा अभाव यामुळे तरुणांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होऊ शकतो. विशेषतः ऑनलाइन गेमिंगचे व्यसन वाढत असताना पालकांनी आणि युवकांनी वेळेवर सावध होणे गरजेचे असल्याचे तज्ज्ञ सांगतात.

-------------

### राजीनामा दिल्यास पेन्शन

पूर्णपीठाने याबाबत महत्त्वपूर्ण निर्णय दिला आहे.पूर्णपीठाने स्पष्ट केले की तामिळनाडू पेन्शन नियम, १९७८ च्या नियम २३ नुसार, सेवा किंवा पदावरून 'राजीनामा' दिल्यास पूर्वीची सेवा गमावली जाते. त्यामुळे, वैद्यकीय किंवा आरोग्याच्या कारणास्तव सेवेतून राजीनामा दिल्यास पूर्वीची सेवा गमावली जाते. राजीनामा कोणत्या कारणास्तव दिला जात आहे हे महत्त्वाचे नाही आणि राजीनाम्याचा अर्थ केवळ पूर्वीची सेवा गमावणे असाच होईल. सर्वसाधारण नियमानुसार तुम्ही सरकारी नोकरीचा राजीनामा दिला, तर तुमची मागील सर्व सेवा (पेन्शनसाठी) रद्द केली जाते. जर तुम्ही दुसरी सरकारी नोकरी स्वीकारण्यासाठी राजीनामा दिला असेल, तर मात्र तुमची जुनी सेवा रद्द होत नाही; ती पेन्शनसाठी ग्रा धरली जाते.

-------------

### एसआयआरमध्ये अडथळा

आठवड्याने वाढवून दिली आहे. सरन्यायाधीश सूर्य कांत यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठाने स्पष्ट केले की, आवश्यक ते सर्व आदेश किंवा स्पष्टीकरणे आम्ही देऊ, परंतु एसआयआर प्रक्रियेत कोणताही अडथळा निर्माण करू दिला जाणार नाही. हे सर्व राज्यांनी लक्षात ठेवावे. या खंडपीठामध्ये सरन्यायाधीश सूर्य कांत, न्यायमूर्ती जोयमाल्य बागची आणि न्यायमूर्ती विपुल एम. पांचोली यांचा समावेश आहे. निवडणूक आयोगाकडून पश्चिम बंगालमध्ये मतदार याद्यांच्या पुनरीक्षणाचे काम सुरू आहे. या प्रक्रियेत हजारो मायक्रो-ऑब्झर्व्हर्स (सूक्ष्म निरीक्षक) तैनात करण्याच्या आयोगाच्या निर्णयाला ममता बॅनर्जी यांनी न्यायालयात आव्हान दिले आहे. या प्रक्रियेत अनियमितता असल्याचा आरोप त्यांनी केला आहे. तर निवडणूक आयोगाने राज्य सरकारवर असहकार्याचा आरोप केला असून, ही कारवाई घटनात्मक अधिकारानुसारच असल्याचे म्हटले आहे. सुनावणीदरम्यान सरन्यायाधीश सूर्य कांत यांनी विचारले की, मायक्रो-ऑब्झर्व्हर्सच्या ऐवजी ८ हजार हून अधिक ग्रुप-बी अधिकाऱ्यांची नावे पाठवण्यास राज्य सरकारने विलंब का केला? न्यायालयाने राज्य सरकारच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत म्हटले की, आम्ही ४ फेब्रुवारीला निर्देश दिले असताना ७ फेब्रुवारीच्या मध्यरात्री नावे का पाठवण्यात आली? जर हे काम आधी झाले असते, तर कदाचित त्याला मंजुरी मिळाली असती. निवडणूक आयोगाने न्यायालयाला सांगितले की, त्यांनी राज्य सरकारला पाच वेळा पत्रे लिहून आवश्यक अधिकाऱ्यांची मागणी केली होती, मात्र राज्याने ती माहिती दिली नाही. त्यामुळेच आयोगाला स्वतःचे निरीक्षक तैनात करावे लागले. दरम्यान, ममता बॅनर्जी यांनी न्यायालयात सांगितले की, त्या राज्याचे सक्षम अधिकारी उपलब्ध करून देण्यास तयार आहेत.

---------

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
मंगळवार दि. १० फेब्रुवारी २०२६


## थोडक्यात



माजलगाव – रामटेक निवासस्थान मुंबई येथे पर्यावरण मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांची सदिच्छा भेट घेऊन सत्कार करतांना माजलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती नितीनदादा नाईकनवरे.

### सामाजिक समतेचा सलोखा राखण्याचा महंतांचा संदेश

बीड: जिल्ह्यातील नारायणगड आणि भगवानगडाचे महंत एकत्र, एकत्रित प्रवास करत सलोखा राखण्याचा दिला संदेश.



बीड जिल्ह्यात गेल्या अनेक दिवसांपासून जातीय सलोखा अबाधित राहिला पाहिजे यासाठी अनेकांकडून प्रयत्न केले जात आहेत. दिवंगत अजित पवार हे देखील प्रत्येक भाषणात सर्वांनी एकत्रित राहून सलोखा जपला पाहिजे असा संदेश देत होते.आज अहिल्यानगर जिल्ह्यातील एका खासगी कंपनीच्या कार्यक्रमानिमित्त श्री क्षेत्र नारायण गड आणि श्रीक्षेत्र भगवानगडाचे महंत एकत्रित दिसून आले. नारायण गडाचे महंत शिवाजी महाराज आणि भगवानगडाचे महंत नामदेव शास्त्री महाराज यांनी तीन तास एकत्रित वेळ घालवला तसेच एकत्र प्रवास देखील केला. एकत्रित प्रवास करून त्यांनी जिल्ह्यातील नागरिकांना सलोखा राखण्याचा संदेश दिला. याची जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात चर्चा होत आहे. यावेळी त्यांच्यासोबत आमदार सुरेश धस हे देखील उपस्थित होते.

### परिक्षा कालावधीत कलम १६३ प्रमाणे मनाई आदेश

**बीड । प्रतिनिधी**

उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परिक्षा दिनांक १० फेब्रुवारी २०२६ ते १८ मार्च २०२६ माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा आणि दि. २० फेब्रुवारी २०२६ ते दि. १८ मार्च २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आल्या आहेत. सदरील परीक्षा सुव्यवस्थीत पार पाडण्याच्या दृष्टीकोनातून परीक्षा केंद्राच्या परिसरात जमाबंदी आदेश लागू करण्यात आले आहेत.

परिक्षा शांततेच्या वातावरणात पार पाडण्यासाठी परिक्षा चालू असताना बाहेरच्या लोकांकडून उपद्रव होण्याची शक्यता असते. तसेच परिक्षा चालू असताना कॉपी पुरविण्याचा प्रयत्न करतात तसेच परिसरातील झेरॉक्स सेंटरचा कॉपी पुरविण्यासाठी दुरुपयोग होण्याची शक्यता लक्षात घेता, परिक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांना व परिक्षेसाठी नियुक्त अधिकारी, कर्मचा-यानां बाहेरील व्यक्तींचा त्रास होऊ नये, तसेच जिल्हयात कॉपीमुक्त अभियान राबविण्यासाठी जिल्हयातील फेब्रुवारी, मार्च २०२६ मध्ये घेण्यात येणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परिक्षा व माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा केंद्राचे १०० मिटर परिसरात परिक्षेचे साहित्य ठेवण्यात आलेल्या ठिकाणी शांतता व सुव्यवस्था अबाधित रहावी व अनाधिकृत कृत्य होऊ नयेत याकरिता खालील कृत्य करण्यास मनाई भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ नुसार आहे.हे आदेश परिक्षेच्या कामकाजासाठी नियुक्त अधिकारी व कर्मचारी यांना लागू राहणार नाही.परिक्षा केंद्राबाहेर व परिसरात परिक्षेसाठी नियुक्त अधिकारी, कर्मचारी अणि परिक्षार्थी यांना वगळून दोन किंवा दोनपेक्षा जास्त व्यक्ती एकत्र येण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे. परिक्षा केंद्राचे १०० मी परिसरातील सर्व झेरॉक्स केंद्र, फॅक्स केंद्र व ध्वनीक्षेपक ईत्यादी परीक्षा सुरु होण्याच्या एक तास अगोदर पासून ते परीक्षा पेपर संपेपर्यंतच्या कालावधीपर्यंत चालू ठेवण्यासाठी प्रतिबंध करण्यात आला आहे. शासकीय आणि परिक्षेसंबंधीत कर्मचाऱ्यांच्या व विद्यार्थ्यांच्या वाहनाव्यतिरीक्त इतर अनाधिकृत वाहनांना परिक्षा केंद्राच्या १०० मिटर परिसरात येण्यास प्रतिबंध आहे. सदर आदेश कोणत्याही धार्मिक कार्यक्रम, मयताची अंत्ययात्रासाठी लागू राहणार नाहीत.हे आदेश बीड जिल्हयाच्या हद्दीतील उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परिक्षा व माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा केंद्राचे १०० मीटर परिसरात व परीक्षा साहित्य ठेवलेल्या ठिकाणी दि.१० फेब्रुवारी २०२६ ते दि.१८ मार्च २०२६ या कालावधीत त्या-त्या दिवशीच्या परिक्षेच्या वेळेच्या एक तास अगोदर ते परीक्षा पेपर संपेपर्यंतच्या कालावधीसाठी लागू राहातील, असे अपर जिल्हादंडाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे कळविले आहे.

# पत्रकारांच्या परवानगीशिवाय पत्रकार भवनावर सौर पॅनल बसवण्याचे काम सुरू

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

राणी लक्ष्मीबाई टॉवरजवळ असलेल्या नगर परिषदेच्या शॉपिंग कॉम्प्लेक्समधील पत्रकार भवनाच्या इमारतीवर कोणतीही अधिकृत परवानगी न घेता सौर ऊर्जेचे पॅनल बसवण्याचे काम सुरू असल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकारामुळे शहरातील पत्रकार संघटनांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली आहे.

पत्रकार भवन हे पत्रकार संघटनांच्या मालकीचे व विश्वस्तांच्या अधिपत्याखाली असताना, पत्रकार संघटना तसेच पत्रकार भवनाच्या विश्वस्तांची कोणतीही पूर्वपरवानगी न घेता हे काम सुरू करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. हा प्रकार म्हणजे पत्रकारांच्या हक्कांवर थेट गदा आणण्याचा प्रयत्न असल्याचे मत पत्रकार बांधवातून व्यक्त केले जात आहे.

या संदर्भात अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषद संलग्न परळी पत्रकार परिषदेच्या वतीने परळी नगर परिषदेचे मुख्यअधिकारी यांना निवेदन



पत्रकार संघटनांचा तीव्र संताप; काम तात्काळ थांबवण्याची मागणी; अन्यथा लोकशाही मार्गाने आंदोलनाचा इशारा

देण्यात आले आहे. या निवेदनात सदरील काम तात्काळ थांबवावे, अशी स्पष्ट मागणी करण्यात आली असून, अन्यथा लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशाराही देण्यात आला आहे. आंदोलन झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी प्रशासनावर राहील, असेही निवेदनात ठामपणे नमूद करण्यात आले आहे.

या निवेदनावर मराठी पत्रकार परिषदेचे परळी तालुकाध्यक्ष धीरज जंगले, शहराध्यक्ष किरण धोंड यांच्यासह अनेक पत्रकार सदस्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

पत्रकार भवनासंदर्भात परवानगीशिवाय सुरू असलेले हे काम तात्काळ थांबवले जाणार की प्रशासन पत्रकारांच्या इशाऱ्याकडे दुर्लक्ष करणार, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

या प्रकरणामुळे परळी शहरात प्रशासन विरुद्ध पत्रकार असा संघर्ष निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

## क्रांतीनगरमध्ये माता रमाई आंबेडकर यांना अभिवादन

अंबाजोगाई । प्रतिनिधी

रमाई भिमराव आंबेडकर यांची १२८ वी जयंती शहरातील क्रांतीनगर भागात महिला, भगिनींच्या पुढाकाराने मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

माता रमाबाई आंबेडकर (रमाई) या भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या सहचारिणी आणि एक थोर त्यागमूर्ती होत्या. प्रतिकूल परिस्थितीतही घर सांभाळून त्यांनी बाबासाहेबांना उच्च शिक्षणासाठी आणि सामाजिक कार्यासाठी मोलाची साथ दिली. माता रमाई जयंतीनिमित्ताने क्रांतीनगर भागातील महिला, भगिनींनी एकत्र येत, पुढाकार घेऊन माता रमाई भिमराव आंबेडकर यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी केली. सुरूवातीला महिला, भगिनींच्या वतीने अभिवादन करून, पुष्पहार अर्पण व प्रबोधनपर विचार व्यक्त करण्यात आले. यावेळी उपस्थितांनी माता रमाई यांच्या संघर्षमय जीवनकार्याला अभिवादन करीत त्यांच्या त्यागमयी जीवनातून प्रेरणा घेण्याचा संकल्प केला. माता रमाई यांच्या त्याग, कष्ट आणि



बाबासाहेबांना दिलेल्या पाठिंब्यामुळेच भारताला संविधान निर्माता लाभले, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. तर रमाईंच्या त्यागातूनच बाबासाहेबांचे स्वप्न साकार झाले असा मौलिक संदेश ही देण्यात आला. माता रमाई यांच्या संघर्षमय जीवनावर प्रकाश टाकत त्यांच्या त्याग, सहनशीलता आणि समाजासाठीच्या योगदानाचा गौरव ही केला. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक चळवळीत माता रमाई यांची भूमिका अत्यंत मोलाची असल्याचे यावेळी नमूद केले. उपस्थितांनी टाळ्यांच्या गजरात उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. जयंतीनिमित्त निर्मला शिंदे, पुष्पा सोनवणे, उर्मिला घनघाव, जयश्री घनघाव, गजराबाई गोरे, आशा सोनवणे, सुजाता घाडगे, मनिषा कांडे, शामल घनघाव, सुनंदा घनघाव, निर्मला तरकसे यांनी पंचशील ध्वजाचे ध्वजारोहण केले. तसेच यावेळी उपस्थितांना खीरदान करण्यात आले. जयंतीनिमित्त समता सैनिक दल, अंबाजोगाई यांच्या वतीने मानवंदना देण्यात आली. तर यावेळी सामाजिक कार्यकर्ते,महिला, युवक,ज्येष्ठ नागरिक आणि समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पान ६ वरुन...

### यूडी-आयडी शिबिर अचानक

शेतकरी संघर्ष समितीने निवेदनात नमूद केले आहे.

संबंधित अधिकाऱ्यांच्या या मनमानी कारभाराबाबत जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करावी तसेच भविष्यात अशा प्रकारची पुनरावृत्ती होऊ नये, अशी मागणी समितीचे भाई गंगाभीषण थावरे यांनी केली आहे. अन्यथा ग्रामीण रुग्णालयासमोर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला आहे. या संदर्भात वैद्यकीय अधीक्षक, जिल्हा आरोग्य अधिकारी तसेच जिल्हाधिकारी यांना निवेदनाची प्रत पाठविण्यात आली आहे.

### बदामराव पंडित यांच्या

मागणी केली होती. याची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तात्काळ दखल घेतली. दिनांक १७ नोव्हेंबर २०२५ रोजी कक्षा अधिकारी महाराष्ट्र शासन सुनील आखरे यांनी प्रबंधक निरीक्षणे-२, मा उच्च न्यायालय मुंबई यांना माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिलेल्या पत्राचा संदर्भ देऊन गेवराई येथे अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालय स्थापन करणे बाबत मागणी कळवली होती. या अनुषंगाने दिनांक ७ फेब्रुवारी २०२६ रोजी आनंद एल. यावलकर, प्रधान जिल्हा न्यायाधीश बीड यांनी गेवराई येथे जिल्हा आणि अतिरिक्त सत्र न्यायाधीशांच्या न्यायालयाची स्थापना करणे बाबत माननीय उच्च न्यायालयाचे पत्र क्रमांक ()-१२०२, दिनांक ३० जानेवारी २०२६, २०१४/२९३/६०३६ द्वारे गेवराई जिल्हा बीड येथे नवीन जिल्हा आणि अतिरिक्त सत्र न्यायाधीशांचे न्यायालय स्थापन करण्याचा प्रस्ताव तत्वतः स्वीकारला आहे. ११६८ प्रकरणांची पुरेशी प्रलंबितता लक्षात घेता न्यायालयीन इमारत आणि न्यायालयीन अधिकाऱ्यांच्या निवासस्थानासाठी आणि सहाय्यक कर्मचाऱ्यांसाठी निवासी निवासस्थान बांधण्याच्या आधीन असल्याचे म्हटले आहे. माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांच्या प्रयत्नामुळे यापूर्वीच गेवराई येथे कोर्टाची फर्निचर सह भव्य इमारत उभा राहिलेली आहे. आता या नव्या आदेशामुळे हीच कोर्ट इमारत लवकरच दुमजली होणार आहे. यामुळे गेवराईतील सर्व वकील बांधवांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांचे आभार मानले आहेत.

### शनी मंदिराच्या प्रवेशद्वारावर

कोणताही कायदेशीर आदेश नसताना स्थळ पाहणी करणे हे प्रक्रियात्मक कायद्याच्या विरोधात असल्याचा दावा विश्वस्तांकडून करण्यात आला आहे. या घटनेमुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता असल्याने संबंधितांवर योग्य कारवाई करण्याची मागणी होत आहे. याप्रकरणी उपसंचालक छत्रपती संभाजीनगर, पोलीस अधीक्षक तसेच स्थानिक पोलीस ठाण्यात स्वतंत्र तक्रारी दाखल करण्यात आल्या असून पुढील चौकशीची मागणी करण्यात आली आहे.

### बीड जि.प. साठी भाजपची

भाजपने एक हाती झेंडा फडकवला आहे. आता होऊ घातलेल्या जिल्हा परिषद आणि पंचायत समितीची निवडणूक माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांच्या नेतृत्वाखाली होणार आहे. त्याबाबत रणनीती ठरवण्यासाठी आणि गेवराई मतदार संघातील विविध विकास कामांच्या नियोजनासाठी माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांनी दिनांक ९ फेब्रुवारी २०२६ रोजी मुंबई येथे जाऊन राज्याच्या ग्रामविकास व महिला बालकल्याण मंत्री पंकजाताई मुंडे यांची त्यांच्या रामटेक या निवासस्थानी भेट घेतली. त्यांच्या समवेत माजी अर्थ व बांधकाम सभापती युधाजित पंडित, माजी जि प सदस्य श्यामराव राठोड यांची उपस्थिती होती. नुकत्याच झालेल्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत भारतीय जनता पार्टीला घवघवीत यश मिळाल्याबद्दल ना पंकजाताई मुंडे यांचे माजी मंत्री बदामराव पंडित आणि माजी सभापती युधाजित पंडित यांनी पुष्पगुच्छ देऊन शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी निवडणुकीसह विविध विषयांवर सविस्तर सकारात्मक चर्चा झाल्याचे समजते.

### आ.धस यांच्या वाढदिवसा

क्षेत्रात सामाजिक उपक्रम राबविण्याच्या हेतूने आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाचे आयोजक परिवंत गायकवाड व जयदीप परिवंत गायकवाड (जयदीप कन्स्ट्रक्शन,आ. सुरेश धस मित्र मंडळ क-हेवडगाव असून, विद्यार्थिनींच्या शैक्षणिक प्रगतीस हातभार लावणारा हा उपक्रम निश्चितच प्रेरणादायी ठरणार आहे.

### जिल्हाधिकारी कार्यालयासमोर

यू-टर्न सुविधा उपलब्ध करून द्यावी

या आंदोलनानंतर जिल्हाधिकाऱ्यांमार्फत केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, राज्यपाल, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री तसेच राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या प्रकल्प संचालकांना निवेदन सादर करण्यात आले.

या आंदोलनात माहिती आधिकार कार्यकर्ते शेख युनुस, सुदाम तांदळे, शेख मुबीन, माजी सैनिक अशोक येडे( जिल्हाध्यक्ष आम आदमी पार्टी),रामधन जमाले (जिल्हाध्यक्ष इंटक बीड) नितीन सोनावणे ( जिल्हाध्यक्ष ऑल इंडिया पँथर सेना), सय्यद सादेक (बीड शहराध्यक्ष आम आदमी पार्टी)यांच्यासह अनेक सामाजिक कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

## स्वातंत्र्य सैनिक स्व. सुर्यभान पवार स्मरणार्थ राज्यस्तरीय ग्रंथमित्र पुरस्काराने डॉ. राजेंद्र सानप सन्मानित

बीड । प्रतिनिधी

दि.६ फेब्रुवारी रोजी परभणी जिल्हा ग्रंथालय संघाच्या ४८वे वार्षिक अधिवेशन पुर्णा येथे. स्वातंत्र्य सैनिक सुर्यभान पवारयांच्या स्मरणार्थ ग्रंथालय क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यां साठीचा राज्य स्तरीय''ग्रंथमित्र पुरस्कार २०२६''या वर्षीचा पुरस्कार सार्वजनिक ग्रंथालय चळवळीत ३५ वर्षांपासून स्वतःला वाहून घेणारे.सामाजिक, राजकीय, अध्यात्मिक क्षेत्रात सक्रिय सहभागी असणारे.बीड जिल्हा ग्रंथालय संघाचे माजी अध्यक्ष,मराठवाडा विभागीय ग्रंथालय संघाचे माजी कोषाध्यक्ष व सध्या महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाचे सदस्य डॉ राजेंद्र सानप यांना मराठवाडा विभागाचे सहायक ग्रंथालय संचालक सुनील हुसे साहेब यांच्या हस्ते ग्रंथमित्र पुरस्कार देवुन सन्मानित करण्यात



आले.यावेळी राज्य ग्रंथालय संघाचे माजी अध्यक्ष प्राचार्य डॉ रामेश्वर पवार, मराठवाडा विभाग ग्रंथालय संघ अध्यक्ष खंडेराव सरनाईक,कार्यवाह राम मेकले,प्रा डॉ राजेंद्र कुंभार,डॉ सुभाष चव्हाण,धर्मराज वीर,व ग सुर्यवंशी यांच्यासह असंख्य मान्यवरांच्या उपस्थितीत ग्रंथमित्र पुरस्कार देवुन सन्मानित करण्यात आले.

बीड जिल्हात शासनाच्या ''गाव तिथे ग्रंथालय! या धोरणानुसार गावा गावात ग्रंथालय चळवळ उभारली जावी यासाठी गेल्या ३५वर्षापासुन ग्रंथालय क्षेत्रात रचनात्मक कार्य करणाऱ्या ग्रंथप्रेमी डॉ राजेंद्र सानप यांनाराज्यस्तरीय ग्रंथमित्र या पुरस्कार मिळाल्याबद्दल विविध क्षेत्रातुन त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.या कार्यक्रमास प्रा विलास वैद्य, राजेंद्र हंबीरे, धनंजय पवार,नरहरी मंठेकर, शेख इब्राहिम,धनंजय सानप, धम्मपाल वैद्य यांच्या सह असंख्य उपस्थितीत होते .

## आ.सुरेश धस यांच्या वाढदिवसानिमित्त विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप

कडा । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील टाकळी अमिया येथील युवा नेतृत्व शहादेवदादा महादेव चौधरी यांनी आ.सुरेश(आण्णा)धस यांच्या वाढदिवसानिमित्त होणारा अतिरिक्त खर्च टाळुन परिसरातील जिल्हा परिषद शाळांमधील सुमारे ७०० विद्यार्थ्यांना शालेय पॅड व इतर शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.



पुढील महिन्यात सुरू होणाऱ्या शालेय परीक्षांच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी उपयुक्त ठरेल, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. वाहिरा, पुंडी, पिंपळगाव दाणी, आनंदवाडी, सराटेवडगाव, रूई आणि टाकळी अमिया येथील जिल्हा परिषद शाळांमधील विद्यार्थ्यांना हे साहित्य वितरित करण्यात आले.

वाटप करण्यात आलेल्या पॅडवर मराठवाडा भूषण आमदार सुरेश धस यांचे नाव व छायाचित्र असून, त्याचबरोबर त्यांच्या वाढदिवसानिमित्त शुभेच्छा संदेश छापण्यात आला आहे. पॅडच्या मागील बाजूस विद्यार्थ्यांसाठी अत्यंत प्रेरणादायी असा संदेश देण्यात आला आहे.

या संदेशात ''शिक्षण हे केवळ पुस्तकी ज्ञान नसून जीवनाला दिशा देणारे साधन आहे. आजची मेहनत उद्याचे यश घडवते. अडचणी येतील, पण हार मानू नका. सतत शिकत राहा, स्वतःच्या क्षमतेवर विश्वास ठेवा आणि उज्ज्वल भविष्यासाठी प्रयत्नशील राहा,'' असे मार्गदर्शन करण्यात आले आहे.

ऐन परीक्षेपूर्वी शालेय साहित्य मिळाल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण असून यावेळी पालक व सर्व शिक्षक, ग्रामस्थ सह पत्रकार उपस्थित होते या कौतुकास्पद कार्यामुळे पंचक्रोशीतुन त्यांचे कौतुक केले जात आहे.

## भारतीय बौद्ध महासभेच्या वतीने त्यागमुर्ती माता रमाई यांची जयंती उत्साहात साजरी

**माजलगाव । प्रतिनिधी**

भारतीय बौद्ध महासभा तालुका शाखा माजलगाव च्या वतीन त्यागमुर्ती माता रमाई यांची १२८ वी जयंती विविध उपक्रमाने उत्साहात साजरी कण्यात आली त्या निमित्त दि २९ जानेवारी ते ७ फेब्रुवारी पर्यंत मौजे सावरगाव येथे महिला उपसिका शिबीराचे आयोजन करण्यात आले या साठी प्रशिक्षक केंद्रिय शिक्षिका तथा बीड पुर्व महिला संस्कार सचिवा आद.संजवनीताई धन्वे या उपस्तीत होत्या तसेच ७फेब्रुवारी रोजी सकाळी ९.०० वाजता माजलगाव शहरामधुन त्यागमुर्ती माता रमाई यांच्या प्रतिमांसमवेत डॉ बाबासाहेब आंबेडकर चौक ते सांची बुद्ध विहार डॉ आंबेडकर भवन केसापुरी कॅम्प आसी भव्य धम्मरॅली काढण्यात आली तसेच



पंचरंगी धम्म ध्वजाचे ध्वजारोहण भारतीय बौद्ध महासभेच्या महिला जिल्हा अध्यक्षा आद.कमलताई डोंगरे यांच्या हस्ते करण्यात आले त्या नंतर व्याख्यान घेण्यात आले या साठी प्रमुख मार्गदर्शक म्हणुन केंद्रीय शिक्षीका संजीवनी ताई धन्वे या होत्या तर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणुन महिला तालुका अध्यक्षा आद.मंदाताई साळवे या होत्या तर या कार्यक्रमासाठी बीड पुर्व चे जिल्हाअध्यक्ष आद.ॲड बी बी धन्वे , जिल्हा संस्कार उपाध्यक्ष एस बी मोरे, जिल्हा संस्कार सचिव शामभाऊ वाघमारे,आशाताई मोरे,जिल्हा संघटक बी सी डोंगरे, शोभाताई भोजने , शहर अध्यक्ष प्रा एल आर मस्के सह धम्म उपासक-उपासिका उपस्तीत होते या कार्यक्रमाचे प्रस्तावीक तालुका सरचिटणीस कोमल डोंगरे यानी केले तर आभार डॉ भागवत साळवे यांनी मानले तर सुत्र संचलन सिद्धार्थ वक्ते यानी केले तर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डी एस साळवे , दयानंद साळवे, नितिन डोंगरे, भगवान डोंगरे,भानुदास साळवे,राजेभाऊ साळवे,विशाल साळवे कुणाल निसर्गंध बळीराम काकडे,मोहन काकडे, कालीदास साळवे,डी पी पोटभरे , बाबासाहेब घनघाव, चक्रधर पोटभरे, सिद्धांत साळवे, अनुराधा साळवे,विशाखा वाघमारे, कावेरी साळवे, चंद्रकला साळवे,निलावती साळवे ,विजयमाला साळवे,वंदना घनघाव,अंतिका गायकवाड, वंदना साळवे ,यांच्या सह भारतीय बौद्ध महासभेचे पदाधिकारी यांनी परिश्रम घेतले.

पान ६ वरुन...

### देशपातळीवरील महापशुधन

आहे. महापशुधन एक्स्पो २०२६ प्रमुख वैशिष्ट्ये एकूण ३२ एकर विस्तीर्ण जागेवर भव्य आयोजन, पशुसंवर्धनाशी संबंधित ३०० पेक्षा जास्त माहितीपूर्ण स्टॉल्स, विविध जातीवंत पशुप्रजातींचे १३०० पेक्षा जास्त पशुधन एकाच ठिकाणी पाहण्याची संधी., उत्कृष्ट जातीच्या देशी व संकरीत गायी-म्हशींचे विशेष प्रदर्शन., पेट शो, मुक्तसंचार गोठा व अर्धबंदिस्त शेळीपालन यासारख्या आधुनिक पशुपालन पद्धतींचे दर्शन.परसातील कुक्कुटपालन व विविध कुक्कुट प्रजाती एकाच छताखाली पाहण्याची संधी. विविध प्रकारच्या चारा पिकांच्या लागवडीबाबत मार्गदर्शन., पशुसंवर्धनातील विविध विषयांवर तज्ज्ञांच्या उपस्थितीत माहितीपूर्ण चर्चासत्रे., शासनाच्या विविध योजनांचे थेट सादरीकरण व मार्गदर्शन. पशूंचे प्रदर्शन न राहता, शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नतीसाठी एक दिशादर्शक मंच ठरावा. प्रदर्शनात येणाऱ्या पशुपालकांची गैरसोय होणार नाही, याची विशेष काळजी घेण्याचे निर्देशही त्यांनी प्रशासनाला दिले. या प्रदर्शनामुळे मराठवाड्यासह संपूर्ण महाराष्ट्रातील पशुपालन क्षेत्राला मोठी चालना मिळणार असून, शेतकरी / पशुपालकांसाठी हे प्रदर्शन मार्गदर्शक व प्रेरणादायी ठरणार आहे. परळी वैद्यनाथच्या नगरीतील इतिहासात प्रथमच देश पातळीवरील पशुधन महा एक्सपो आयोजित करण्यात आला आहे. विशेष योगायोग म्हणजे महाशिवरात्रीच्या पर्वकाळात पशुपालकांसाठी देशपातळीवरील पशुप्रदर्शन ही महापर्वणी ठरणार आहे. ना.पंकजाताई मुंडे यांच्या संकल्पनेतून होणाऱ्या परळी वैद्यनाथ येथील देशपातळीवरील महापशुधन एक्स्पो-२०२६ या भव्य प्रदर्शनाचा शेतकरी व पशुपालकांनी मोठ्या संखेने सहभाग घ्यावा असे आवाहन भाजपचे तालुकाध्यक्ष राजेश गित्ते व सर्व पदाधिकारी यांनी केले.

राज्य लोकतंत्र
शेत-शिवार
मंगळवार दि. १० फेब्रुवारी २०२६


# दशकात यंदा रब्बीचे सर्वाधिक क्षेत्र

## पश्चिम विदर्भात सरासरीच्या ११५ टक्के पेरणी

पुणेः सरासरीपेक्षा जास्त पावसाने खरिपाचे नुकसान झाले असले तरी रब्बीसाठी हाच पाऊस पोषक ठरला आहे. पश्चिम विदर्भात यंदाच्या रब्बीसाठी सरासरी ९.१३ लाख हेक्टर क्षेत्र प्रस्तावित असताना सद्यस्थितीत १०.४४ लाख हेक्टर क्षेत्रात पेरणी झालेली आहे. ही ११४.३६ टक्केवारी आहे.

यामध्ये गव्हाची क्षेत्रवाढ झालेली आहे. परिणामी दशकात यावर्षी रब्बीचे सर्वाधिक पेरणीक्षेत्र ठरले आहे. सततचा पाऊस, अतिवृष्टी यामुळे पुनर्भरण झाल्याने जमिनीत वाढलेली आर्द्रता जिरायती हरभऱ्यासाठी पोषक ठरलेली आहे. शिवाय भूजलस्तरात वाढ झाल्याने गव्हाच्या सिंचनाला पाणी उपलब्ध आहे. अशा परिस्थितीत गव्हाचे सरासरी क्षेत्र २.२५ लाख हेक्टर असताना सद्यस्थितीत ३.०३ लाख हेक्टरमध्ये पेरणी झालेली आहे. ही १३४.५४ टक्केवारी आहे. त्यातुलनेत हरभऱ्याचे सरासरी क्षेत्र ६.३९ हेक्टर असताना ६.२६ लाख हेक्टरमध्ये पेरणी झालेली आहे. ही ९७.९८ टक्के आहे. या दोन पिकांमध्ये रब्बीचे ९० टक्के पेरणीक्षेत्र आहे. यामध्ये तेलबिया क्षेत्रात मोठ्या प्रमाणात कमी आलेली आहे. खरिपाच्या हंगामात सर्व पावसाची सरासरी पार झाली. ऑक्टोबरपर्यंत पावसाची रिपरिप सुरू होती. शिवाय अतिवृष्टीने शेतात पाणी साचून पिकांचे मोठे नुकसान झाले व सरासरी उत्पादनात कमी आल्याने शेतकऱ्याची मदार रब्बी हंगामावर आहे.

पीकनिहाय पेरणीक्षेत्र (हेक्टर) : रबी ज्वारी – १७,०६६. गहू – ३,०२,७८९. मका – ४३,५९०. रभरा – ६,२६,६०६. करडई – १,३३०. जवस – २९.६०. तीळ – ३७६.६०. सूर्यफूल – ५९. मोहरी – २५७.४०. चिया सीड – ९०८३.



# सुपर नेपियर चाऱ्याची लागवड करा; वर्षभर मिळेल मुबलक चारा!



शेतीला जोडधंदा म्हणून पशुपालन व्यवसाय मोठ्या प्रमाणावर केला जातो. पशुपालनामध्ये सगळ्यात जास्त चाऱ्याची आवश्यकता असते. कारण पशुपालकांचा सगळ्यात जास्त खर्च हा जनावरांच्या चारा व्यवस्थापनावर होतो. जनावरांना चाऱ्याची उपलब्धता व्हावी, यासाठी शेतकरी वेगवेगळ्या प्रकारच्या चाराची लागवड करतात. परंतु बऱ्याच शेतकऱ्यांची समस्या असते की त्यांचा पशुपालनाचा आवाका मोठा असतो. परंतु त्यामानाने त्यांच्याकडे उपलब्ध चारा लागवडीसाठीचे क्षेत्र कमी असते व असे पशुपालक हे चारा विकत घेऊन जनावरांची आहाराची गरज भागवतात. सुपर नेपियर चाऱ्याच्या लागवडीबाबत अधिक माहिती जाणून घेतल्यास शेतकऱ्यांना वर्षभर चाऱ्याची चिंता करण्याची गरज पडणार नाही.

सुपर नेपियर गवत : सुपर नेपियर गवत हे मूळचे थायलंड या देशातील असून, आपल्याकडे देखील मोठ्या प्रमाणात या गवताची लागवड केली जात आहे. पशुपालकामध्ये मोठ्या प्रमाणात लोकप्रिय असल्यामुळे, सुपर नेपिअर लागवडीच्या माध्यमातून शेतकऱ्यांना चांगले उत्पादन मिळणे शक्य आहे. काही ठिकाणी जवळ-जवळ सात ते आठ एकर जमिनीत सुपर नेपियर लागवडीच्या माध्यमातून शेतकरी लाखो रुपये प्रति महिन्याला कमवत आहेत. विशेष म्हणजे कमी पाण्यात येणारे हे चारा पीक असून, दुष्काळग्रस्त पट्ट्यात देखील याची लागवड केली जाऊ शकते.वर्षभर मिळतो मुबलक चारा : पशुखाद्य म्हणून याचा खूप उपयोग होतो. सुपर नेपियर गवताचे उत्पादन हे वर्षभर सुरु राहत असल्यामुळे डेअरी उत्पादक शेतकऱ्यांना जनावरांसाठी हिरवा चारा वर्षभर उपलब्ध होतो. सुपर नेपियर गवत एकदा लागवड केल्यानंतर सात ते आठ वर्ष यापासून उत्पादन मिळत राहते. यामध्ये क्रमाक्रमाने त्याची कापणी केली जाते व दुसर्या बाजूने शेतात एक कलम टाकल्यानंतर दुसरे कलम तयार होत असते. सुपर नेपियर गवत १५ फूट उंच वाढते व यापासून चांगल्या प्रतीचा हिरवा आणि सुका चारा देखील मिळतो.सुपर नेपियर गवताला खर्च कमी असून मात्र त्या तुलनेत उत्पादन जास्त मिळते.

# मुरघास बनवण्याची सोपी ट्रिक

आपल्या देशात विशेषतः ग्रामीण भागात हिरव्या चाऱ्याची उपलब्धता ही मोठी समस्या आहे. साधारणपणे पावसाळ्याच्या फक्त तीन ते चार महिन्यांतच शेतकऱ्यांना मुबलक प्रमाणात हिरवा चारा मिळतो. मात्र उरलेल्या आठ ते नऊ महिन्यांत हिरव्या चाऱ्याची तीव्र कमतरता भासते. अशा वेळी दुभत्या जनावरांचे दूध उत्पादन टिकवून ठेवणे कठीण होते. या समस्येवर मुरघास (सायलेज) हा अतिशय उपयुक्त आणि किफायतशीर उपाय आहे.मुरघास म्हणजे हिरव्या चाऱ्याचे शास्त्रीय पद्धतीने साठवण करून तयार केलेले पौष्टिक जनावरांचे खाद्य. मका, ज्वारी, बाजरी यांसारख्या एकदल पिकांच्या हिरव्या चाऱ्यापासून उत्तम प्रतीचा मुरघास तयार करता येतो. मुरघास बनवण्याची प्रक्रिया सोपी असून त्यासाठी फार मोठा खर्चही येत नाही. त्यामुळे लहान व मध्यम शेतकऱ्यांसाठी हा उत्तम पर्याय ठरतो.

कमी खर्चात मुरघास असा तयार करा : मुरघास तयार करण्यासाठी सर्वात आधी योग्य वेळी पीक कापणे महत्त्वाचे असते. मक्याचे पीक पोटरीवर येऊन दाणे दुधाळ अवस्थेत असताना कापावे. ज्वारी किंवा बाजरीचे पीक फुलोऱ्यावर आले की कापणी करावी. या अवस्थेत कापलेला चारा अधिक पौष्टिक आणि रसदार असतो.कापलेले पीक कुट्टी यंत्राच्या सहाय्याने बारीक करावे. ही कुट्टी तयार झाल्यानंतर ती मुरघासासाठी तयार केलेल्या खड्ड्यात टाकावी. खड्डा भरताना चाऱ्यावर सतत दाब देणे खूप गरजेचे असते. यामुळे खड्ड्यात हवा शिरत नाही. जर खड्ड्यात हवा राहिली, तर चारा कुजण्याची शक्यता वाढते आणि मुरघास खराब होऊ शकतो.उत्तम दर्जाचा मुरघास तयार होण्यासाठी कुट्टी केलेल्या चाऱ्यावर ठराविक प्रमाणात द्रावण फवारणे आवश्यक असते. चाऱ्याच्या वजनानुसार १ ते १.५ टक्के गुळाचे पाणी आणि सुमारे १ टक्का युरिया पाण्यात मिसळून त्याची फवारणी करावी. यामुळे मुरघासाची चव, वास आणि पोषणमूल्य वाढते.खड्डा पूर्ण भरल्यानंतर वरच्या भागावर १ ते २ फूट उंच वैरणीचा ढीग करावा. त्यावर गवत किंवा कडब्याच्या पेंढ्याचा थर पसरावा. त्यानंतर शेण व चिखल यांच्या मिश्रणाचा जाड थर देऊन खड्डा पूर्णपणे बंद करावा. इच्छित असल्यास पॉलिथिन किंवा प्लास्टिक शीट वापरून खड्डा अधिक सुरक्षितपणे झाकता येतो.मुरघास तयार होण्यासाठी साधारणपणे ४५ ते ६० दिवसांचा कालावधी लागतो. त्यानंतर खड्ड्याच्या एका बाजूला छोटेसे छिद्र करून रोज आवश्यक तेवढाच मुरघास काढावा. मुरघास काढल्यानंतर खड्ड्याचे तोंड पुन्हा नीट बंद करणे आवश्यक असते.दुभत्या जनावरांना दररोज साधारण १० ते १५ किलो मुरघास खायला द्यावा. मुरघास आंबट-गोड चवीचा असल्यामुळे जनावरे तो आवडीने खातात. पावसाळ्यात जादा उपलब्ध असलेल्या हिरव्या चाऱ्याचा मुरघास तयार करून तो उन्हाळा व दुष्काळी काळात वापरल्यास दूध उत्पादन वाढण्यास नक्कीच मदत होते.



# पक्षिथांबे शेती रक्षणासाठी फायदेशीरच

विविध किडींच्या नियंत्रणासाठी शेतात पक्षिथांबे उभारणे ही अत्यंत जुनी आणि निसर्गावर आधारित पद्धत आहे. पक्षिथांबे हा सोपा, स्वस्त व परिणामकारक उपाय असून, कीड नियंत्रणाबरोबरच पर्यावरण संवर्धनातही महत्त्वाचा घटक म्हणून कार्य करतो. शेतामध्ये पक्षिथांबे उभारल्यामुळे किडींचे नैसर्गिकरीत्या नियंत्रण होते. पिकांवर दरवर्षी नवनवीन किडींचा प्रादुर्भाव वाढत चालला आहे. प्रत्येक एक ते दोन वर्षांत नवीन कीड दिसून येत आहे. या किडींच्या प्रादुर्भावामुळे पिकांचे अतोनात नुकसान होते.

किडींवर नियंत्रण मिळविण्यासाठी वारंवार विविध रासायनिक कीटकनाशकांच्या फवारण्या घेतल्या जातात. त्यामुळे एकूणच उत्पादन खर्च वाढतो, जमिनीची सुपीकता कमी होते, पर्यावरणाचे नुकसान होते. याशिवाय कीटकनाशकांचा रासायनिक अंश पीक उत्पादनात राहिल्यामुळे मानवी तसेच पशुधनाच्या आरोग्यावर वाईट परिणाम होतात. हे सर्व टाळण्यासाठी एकात्मिक कीड व्यवस्थापन पद्धतीचा अवलंब करणे अत्यंत आवश्यक आहे. एकात्मिक कीड व्यवस्थापनामध्ये जैविक नियंत्रण पद्धती अत्यंत प्रभावी आणि पर्यावरण पूरक ठरतात. निसर्गातील किडींच्या भक्षकांचा योग्य वापर केल्यास, रासायनिक उपायांशिवायही प्रभावी कीड नियंत्रण करणे शक्य होते.

पक्षिथांबे म्हणजे काय ? : शेतामध्ये पक्ष्यांना बसण्यासाठी आणि विश्रांती घेण्यासाठी केलेली सोपी व्यवस्था म्हणजे पक्षिथांबे. हे पक्षिथांबे वापरून कीड नियंत्रण करणे ही खूप जुनी आणि निसर्गावर आधारित पद्धत आहे. रासायनिक कीटकनाशके येण्याआधी शेतकरी निसर्गातील घटकांचा उपयोग करून किडींवर नियंत्रण ठेवत होते. त्यामध्ये पक्षी हे शेतकऱ्यांचे सर्वांत मोठे मदतनीस होते. त्यात मुख्यतः कावळे, मैना, बुलबुल, सुतार, घार, घुबड, कोतवाल असे अनेक कीटकभक्षी पक्षी पिकांतील किडी आणि इतर सूक्ष्मजीव खातात. अनेक प्रजातींचे पक्षी फक्त कीटकच नाही तर त्यांची अंडी, अळी, कोष अवस्था देखील खातात. त्यामुळे शेतीमध्ये किडींची संख्या नैसर्गिकरीत्या नियंत्रणात ठेवली जाते. परिणामी रासायनिक कीटकनाशकांचा वापर कमी होतो.



पारंपरिक शेती पद्धतीपासून पक्षिथांब्यांचा वापर : पारंपरिक शेतीमध्ये शेतात बांबू, झाडांच्या सुक्या फांद्या किंवा काठ्या रोवून ठेवल्या जात. त्यावर पक्षी बसून पिकांतील किडी टिपून खात असत. मात्र कालांतराने रासायनिक कीटकनाशकांचा शेतीमध्ये अतिवापर, झाडांची तोड होऊ लागल्याने पक्ष्यांचे अधिवास हळूहळू नष्ट होऊन पक्ष्यांची संख्या कमी होत गेली. आणि शेतामध्ये पक्षिथांब्याची उभारण्याची पद्धत मागे पडली. मात्र आता पुन्हा एकात्मिक कीड व्यवस्थापनात पक्षिथांबे ही नैसर्गिक व पर्यावरणपूरक पद्धत म्हणून महत्त्वाची ठरत आहे. या पद्धतीचा अवलंब केल्यास कमी खर्चात कीड नियंत्रण होऊन रासायनिक कीटकनाशकांवरील अवलंबन कमी होते आणि पर्यावरणाचे संतुलन राखले जाते.

कृत्रिम पक्षिथांबे उभारण्याची पद्धती : पिकाच्या उंचीनुसार ६ ते ८ फूट उंचीच्या काठ्या वापराव्यात. एक एकरसाठी साधारण १० ते १५ पक्षिथांबे योग्य ठरतात. इंग्रजी 'टी' आकारात टीव्ही अँटेनासारखे दांड्याच्या टोकाला आडवी काठी बांधल्यास पक्ष्यांना बसणे सोईचे होते. हे पक्षिथांबे पिकाच्या सुरुवातीच्या अवस्थेतच बसवावेत, म्हणजे पक्ष्यांनी त्यावर येऊन बसण्याची सवयी लागते. कापूस, भाजीपाला, डाळी, तृणधान्ये अशा अनेक पिकांमध्ये उपयुक्त.

पक्षिथांबे वापरण्याचे फायदे : कीटकनाशकांवरील अवलंबन कमी होऊन पर्यावरणाचे संतुलन राखले जाते. शेतीतूनच मिळणाऱ्या टाकाऊ गोष्टींपासून तयार करता येतात, त्यामुळे खर्च कमी होतो. पक्षिथांब्यांचे व्यवस्थापन करणे सोपे असल्यामुळे वेगळी देखभाल करण्याची गरज नाही. जैविक कीड नियंत्रणामुळे पिकांची वाढ चांगली होऊन उत्पादनात सुधारणा होते.

घ्यावयाची काळजी : रासायनिक कीटकनाशकांचा अतिरेक टाळावा. गरजेनुसार वापर करावा. क्ष्यांच्या नैसर्गिक अधिवासाचे संरक्षण करावे. जमिनीची मशागत करत असताना पक्ष्यांच्या अंड्यांना इजा होणार नाही दक्षता घ्यावी. एकल पीक पद्धती टाळून आंतरपीक पद्धतीचा अवलंब करावा. गाव पातळीवर पक्षी संवर्धन मोहीम तसेच त्यासंदर्भात जनजागृती करावी. पक्षिथांबे हे एकात्मिक कीड व्यवस्थापनाचे महत्त्वाचे घटक आहेत. मशागतीय उपाय, जैविक उपाय, कामगंध सापळे, प्रकाश सापळे यासोबत पक्षिथांबे वापरल्यास रासायनिक कीटकनाशकांची गरज कमी होते.

## दिन विशेष

### जागतिक दिवस

वन अग्नि सुरक्षा साप्ताहाच चौथा दिवस.
व्हॅलेंटाईन आठवड्याचा चौथा दिवस
(टेडी दिवस)

### महत्वाच्या घटना

१९२१ : ड्यूक ऑफ़ कनॉट ने भारतातील इंडिया गेट चा पाया आजच्या दिवशी रचला.
१९२१ : महात्मा गांधी यांनी काशी विद्यापीठाची स्थापना केली.
१९२३ : टेक्सास टेकनॉलोजिकल कॉलेज सध्याचे टेक्सास टेक विद्यापीठाची स्थापना केली.
१९२९ : जे. आर. डी टाटा हे पहिले अधिकृत भारतीय वैमानिक बनले.
१९३१ : भारताची राजधानी कोलकात्याहुन नवी दिल्ली येथे हलवली.
१९३३ : न्यूयॉर्कमध्ये झालेल्या एका मुष्टियुद्ध लढतीत प्रिमो कार्नेरा याने अर्नी शाफ याचा १३ व्या फेरीत पराभव केला. या लढतीत अर्नी शाफचा मृत्यू झाला.
१९४८ : पुणे विद्यापीठाची स्थापना
१९४९ : गांधी-वध अभियोगातून स्वातंत्र्यवीर सावरकर यांची निष्कलंक सुटका झाली.
१९७९ : इटानगर हे शहर अरुणाचल प्रदेश ची राजधानी बनले.
१९९६ : आय. बी. एम. कंपनीने बनवलेल्या ''डीप ब्लू'' या महासंगणकाने बुद्धीबळात गॅरी कास्पारॉव्हचा पराभव केला.
२००५ : उत्तर कोरियाने आपण अण्वस्त्रसज्ज असल्याचे जाहीर केले.
२००९ : आजच्या दिवशी पंडित भीमसेन जोशी यांना भारतरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८४७ : प्रसिद्ध लेखक नवीनचंद्र सेन यांचा जन्म.
१८०३ : जगन्नाथ ऊर्फ 'नाना' शंकरशेठ दानशूर व शिक्षणतज्ज्ञ (मृत्यू: ३१ जुलै १८६५)
१८९४ : हॅरॉल्ड मॅकमिलन इंग्लंडचे पंतप्रधान (मृत्यू: २९ डिसेंबर १९८६)
१९१० : दुर्गा भागवत साहित्यिका व मानववंशशास्त्रज्ञ (मृत्यू: ७ मे २००२)
१९४२ : भारतीय अभिनेत्री माधबी मुखर्जी यांचा जन्म.
१९४५ : राजेश पायलट केंद्रीय मंत्री (मृत्यू: ११ जून २०००)
१९७० : प्रसिद्ध भारतीय कवी कुमार विश्वास यांचा जन्म.
१९८५ : प्रसिद्ध गायिका महाथी यांचा जन्म

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८६५ : हेन्रिक लेन्झ जर्मन भौतिकशास्त्रज्ञ (जन्म: १२ फेब्रुवारी १८०४)
१९१२ : सर जोसेफ लिस्टर निर्जंतुकीकरणामुळे जखमा लवकर बर्या होतात हे सिध्द करणारा ब्रिटिश शल्यविशारद (जन्म: ५ एप्रिल १८२७)
१९२३ : विलहेम राँटजेन नोबेल पारितोषिकविजेते जर्मन भौतिकशास्त्रज्ञ (जन्म: २७ मार्च १८४५)
१९८२ : नरहर कुरुंदकर विद्वान, टीकाकार आणि लेखक (जन्म: १५ जुलै १९३२)
१९९५ : प्रसिद्ध हिंदी साहित्यकार गुलशेर ख़ाँ शानी यांचे निधन.
२००१ : गानतपस्विनी मोगुबाई कुर्डीकर जयपूर अत्रौली घराण्याच्या शास्त्रीय गायिका (जन्म: १५ जुलै १९०४)
२०१२ : एच. आर. एल. मॉरिसन चे संस्थापक लॉईड मॉरिसन यांचे निधन. (जन्म: १८ सप्टेंबर १९५७)

# उडीद शेती करताना या गोष्टी लक्षात ठेवा

## उत्पादनात होईल वाढ



उडीद हे कडधान्य पिकांपैकी एक आहे. हे असे पीक आहे, ज्यामध्ये पोषक तत्वांचा मोठा साठा आहे. उडीद डाळ आणि मसूरापासून बनवलेल्या अनेक पदार्थांच्या रूपात सेवन केले जाते. यामध्ये प्रथिने, पोटॅशियम, कॅल्शियम, लोह, नियासिन, थायामिन आणि रिबोफ्लेविन भरपूर प्रमाणात असते.उडीद पीक ७० ते ७५ दिवसांत पक्व होण्यास तयार होते, त्यामुळे उडीद लागवडीतून शेतकऱ्यांना कमी वेळेत चांगला व दुप्पट नफा मिळतो.

उडीद शेतीशी संबंधित गोष्टी : उडीद लागवडीसाठी शास्त्रज्ञांनी महत्त्वाच्या गोष्टी सांगताना शेतकऱ्यांना सांगितले आहे की, शेतकरी बांधवाने काही गोष्टी लक्षात ठेवल्या तर उडीद पिकातून चांगले उत्पन्न मिळते. उन्हाळी हंगाम उडीद लागवडीसाठी योग्य आहे. एप्रिलचा पहिला आठवडा लागवडीसाठी योग्य काळ मानला जातो. त्याचबरोबर ३० ते ४० डिग्री दरम्यानचे तापमान उडीद लागवडीसाठी योग्य मानले जात असल्याचे शास्त्रज्ञांनी सांगितले आहे. मातीबद्दल बोलायचे झाले तर उडीद पिकाच्या लागवडीसाठी माध्यम ते भारी जमीन योग्य मानली जाते, तसेच या जमिनीत पाण्याचा निचराही चांगला असावा. पाणी साचून राहणारी जमीन याला चालत नाही. त्याचबरोबर जमिनीतील आर्द्रतेनुसार पाणी द्यावे. जर माती खूप कोरडी असेल तर आठवड्यातून दोनदा पाणी द्यावे. अन्यथा १५ दिवसांच्या अंतराने करा. उडीद पिकासाठी दोन रोपांतील अंतर १० सेमी ठेवावे. त्याच वेळी, ४ ते ६ सेंटीमीटर खोलीवर बियाणे पेरणे. प्रेणीपूर्वी बीजप्रक्रिया करणे महत्वाचे आहे.

राज्य लोकतंत्र
मराठवाडा वृत्तांत



# परभणीकरांनी सुरेश वरपुडकरांची घराणेशाही नाकारली

## कुटुंबातील ५ पैकी ४ उमेदवारांचा दारुण पराभव; केवळ पुतण्यावर विजयाचा गुलाल

परभणी। प्रतिनिधी

जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीत अनेक ठिकाणी मतदारांनी राजकारण्यांची थोपली जाणारी घराणेशाही नाकारली आहे. परभणी जिल्ह्यातील निवडणुकीत मतदारांनी भाजप नेते तथा माजी मंत्री सुरेश वरपुडकर यांच्या कुटुंबातील ५ पैकी ४ उमेदवारांचा पराभव करून वरपुडकरांना जोरदार झटका दिला आहे. या निवडणुकीत वरपुडकर यांच्या केवळ एका पुतण्याचा विजय झाला आहे. त्यांनी काँग्रेसच्या तिकिटावर निवडणूक लढवली होती. यासंबंधीच्या माहितीनुसार, सुरेश वरपुडकर यांच्या कन्या सोनल देशमुख ह्या झरी जिल्हा परिषद गटातून उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वातील शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडून निवडणुकीच्या रिंगणात उतरल्या होत्या. त्यांचा भजाप उमेदवार दिलीप देशमुख यांनी पराभव केला. वरपुडकरांचे चिरंजीव समशेर वरपुडकर हे शिंगणापूर जिल्हा परिषद गटातून उभे होते. त्यांचाही ठाकरे गटाच्या पांडुरंग खिल्लारे यांनी पराभव केला.

सुरेश वरपुडकर यांच्या स्नुषा प्रेरणा वरपुडकर या ही दैठणा जिल्हा परिषद गटातून निवडणुकीच्या मैदानात उतरल्या होत्या. त्यांचा काँग्रेस उमेदवार ज्योत्स्ना गणेश घाडगे यांनी पराभव केला. दुसरीकडे, लोहगाव जिल्हा परिषद गटात सुरेश वरपुडकरांचे २ पुतणे निवडणूक लढवत होते. त्यातील काँग्रेसच्या तिकिटावर उभ्या राहिलेल्या अजित वरपुडकर यांचा विजय झाला. त्यांनी भाजपचे आपले प्रतिस्पर्धी उमेदवार ऐश्वर्य वरपुडकर यांचा पराभव केला. यामुळे सुरेश वरपुडकर यांना मोठा दिलासा. पण त्यांच्या कुटुंबातील ५ पैकी ४ जणांना पराभवाची चव चाखावी लागल्यामुळे परभणीच्या मतदारांनी त्यांची घराणेशाही नाकारल्याचे चित्र आहे. कुटुंबातील ४ उमेदवारांचा पराभव झाल्यामुळे माजी मंत्री सुरेश वरपूडकर यांना चांगलाच धक्का बसला आहे. नुकत्याच झालेल्या महानगरपालिकेच्या निवडणुकीमध्ये सुरेश वरपूडकर यांच्या पत्नीचा विजय झाला होता. त्यानंतर जिल्हा परिषदेच्या निवडणुकीतही त्यांनी आपल्या घरातील अधिकाधिक उमेदवार देण्याचा प्रयत्न केला होता, पण त्यांच्या या प्रयत्नाला आता अपयश आले आहे

उल्लेखनीय बाब म्हणजे नगरपालिका निवडणुकीत लोहगाव नगरपालिकेत एकाच घरातील पाच जणांना उमेदवारी देण्यात आली होती आणि त्या पाचही जणांचा पराभव झाला होता ही बातमी राज्यभर चर्चिली गेली होती. त्यानंतर परभणीमध्येही असाच प्रकार माजी मंत्र्याने केल्यानंतर मात्र पुन्हा एकदा मतदारांनी त्यांना घरचा रस्ता दाखवला आहे. यामुळे मतदार राजा हा घराणेशाहीला नाकारत असल्याचे स्पष्ट झाले आहे.



## थोडक्यात



### कृषी महोत्सवात शेवगावच्या मसाल्यांना नगरकरांची पसंती

शेवगाव। प्रतिनिधी

नगरमध्ये सध्या सुरू असलेल्या कृषी महोत्सव कृषी पर्व मध्ये शेवगाव तालुक्यातील मसाल्यांनी ग्राहकांचे विशेष लक्ष वेधून घेतले असून येथे शेवगावच्या मसाल्यांना मोठी मागणी आहे. तसेच नागरिक या मसाल्यांची मोठ्या प्रमाणात खरेदी करत आहेत. दर्जा, चव आणि स्थानिक प्रक्रिया यामुळे शेवगावच्या उत्पादनांनी महोत्सवात आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. या कृषी महोत्सवाच्या निमित्ताने शेवगाव तालुक्यातील प्रगतशील शेतकरी, विविध पुरस्कार प्राप्त शेतकरी तसेच पीक स्पर्धेतील विजेते शेतकरी यांचा विविध मान्यवरांच्या उपस्थितीत सन्मान करण्यात आला. महोत्सवात कृषी विभागामार्फत आधुनिक कृषी तंत्रज्ञान, नावीन्यपूर्ण शेती पद्धती, तसेच शासनाच्या विविध योजनांची माहिती देणारे स्टॉल्स उभारण्यात आले आहेत. या ठिकाणी शेतकऱ्यांना तज्ज्ञांशी थेट संवाद साधण्याची संधी मिळत असून शेतीपूरक व्यवसाय, प्रक्रिया उद्योग व मूल्यवर्धन याबाबत मार्गदर्शन केले जात आहे. पीएमएफएमई योजनेअंतर्गत शेतकऱ्यांनी प्रक्रिया करून तयार केलेला शेतमाल थेट ग्राहकांपर्यंत पोहोच होत आहे. शेवगाव तालुक्यातून उभारण्यात आलेले अष्टगुण मसाले व शिंगोरी आमटी यांचे स्टॉल विशेष आकर्षण ठरले आहेत.

### डोंगरात बेवारस सोडून दिले जर्शी गाईंचे वासरं

अहिल्यानगर। प्रतिनिधी

जिल्हा दूध उत्पादनात अग्रेसर असून दररोज सुमारे ४३ लाख लिटर दूध उत्पादन जिल्ह्यात घेतले जाते. दुधाळ गायींचे संकरीत वाण खरेदी विक्री तसेच प्रत्यक्ष दूध उत्पादन घेणे यातून अर्थकारणाला मोठी चालना मिळाली. परंतु, त्यात जन्माला येणाऱ्या नर वासरांचा काहीच उपयोग होत नसल्याने तसेच विक्रीही थांबली असल्याने ते बेवारस सोडून दिले जात आहेत. डोंगरगण भागात अशी लहान वासरे सोडल्याचे आढळून आले.दुधाळ संकरीत गायींच्या किंमती ५० हजारांपासून ते एक लाखांवर आहेत. गाईपासून दूध उत्पादन मोठ्या प्रमाणात मिळते. त्यामुळे जन्माला आलेल्या जर्शी (मादी) वासरेही चांगल्या किंमतीला विकली जातात. परंतु, जन्माला आलेल्या नर वासरांचा तसा फारसा उपयोग होत नाही. या वासरांना मोठे केले तरी त्याला शेती कामासाठी मागणी नाही, तसेच शर्यतीसाठीही जर्शी बैल कोणी घेत नाही. त्यामुळे ही वासरे, जन्माला आल्यानंतर त्यांना सांभाळण्यासाठी होणारा खर्च, वाया जातो. परिणामी बहुतांश ठिकाणी जन्माला आलेली नर वासरे बेवारस सोडण्यात येत आहेत. ही वासरे बिबट प्रवण क्षेत्रात, बिबट्याच्या भक्षस्थानी पडत आहेत. अशी वासरे सांभाळण्यासाठी कोणीही पुढाकार घेत नाही. सद्यस्थितीत डोंगरगण-वांबोरी घाटात लहान वासरे बेवारस सोडून दिल्याचे दिसत आहेत.

## हिंगोलीत किरकोळ कारणावरुन दोघांवर चाकूने वार

### जीवे मारण्याचा प्रयत्न, ५ जणांवर गुन्हा दाखल

हिंगोली। प्रतिनिधी

हिंगोली शहरातील हरणचौक भागात किरकोळ कारणावरून दोघांवर चाकूने वार करून तसेच लोखंडी रॉडने मारहाण करून जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी पाच जणांवर हिंगोली शहर पोलिस ठाण्यात शनिवारी ता. ७ रात्री गुन्हा दाखल झाला आहे. या मारहाणीत गंभीर जखमी झालेल्या दोघांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, हिंगोली शहरातील तलाबकट्टा भागातील सय्यद वसीम यांचा अब्बास कुरेशी याच्यासोबत किरकोळ कारणावरून वाद झाला होता. त्यानंतर सय्यद वसीम हे शुक्रवारी ता. ६ शहरातील हरण चौक भागात आले असतांना पेन्शनपुरा भागातील अब्बास कुरेशी, महेफुज कुरेशी, शेख आदील




कुरेशी, जुनेद कुरेशी, शोएब कुरेशी हे पाच जण त्या ठिकाणी आले. त्यांनी सय्यद वसीम यांच्या सोबत पुन्हा वाद उकरून काढला. शाब्दिक चकमकी नंतर हाणामारीला सुरुवात झाली.

या हाणामारीत अब्बास कुरेशी याने लोखंडी रॉडने सय्यद वसीम यास मारहाण केली तसेच इतरांनी त्यांच्या हातातील चाकूने सय्यद वसीम यांच्या डोक्यात वार केले. या प्रकाराची माहिती मिळाल्यानंतर सय्यद वसीम यांचे भाऊ सय्यद कलीम हे घटनास्थळी दाखल झाले. त्यांनाही पाच जणांनी लोखंडी रॉडने मारहाण केली तसेच त्यांच्यावर चाकूने वार केले. या मारहाणीत सय्यद वसीम व सय्यद कलीम हे दोघे गंभीर जखमी झाले. या घटनेमुळे परिसरात एकच गोंधळ निर्माण झाला होता. या घटनेची माहिती मिळताच हिंगोली शहर पोलिस ठाण्याचे निरीक्षक संदीप मोदे, सहाय्यक पोलिस निरीक्षक आनंद बनसोडे, सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक संजय मार्के, जमादार अशोक धामणे, शेख मुजीब, संतोष करे, गणेश लेकुळे, ठोंबरे यांच्या पथकाने तातडीने घटनास्थळी धाव घेतली. या मारहाणीत जखमी झालेल्या दोघांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. या प्रकरणी सय्यद वसीम यांच्या तक्रारीवरून वरील पाच जणांवर हिंगोली शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

## चिखलठाण्यात ट्रकने तरुणाला उडवले

छत्रपती संभाजीनगर। प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर शहरासाठी रविवारचा दिवस ब्लॅक संडे ठरला. दोन वेगवेगळ्या ठिकाणी झालेल्या भीषण अपघातांनी शहर हादरले असून बेजबाबदार वाहनचालकांनी दोन हसती-खेळती कुटुंबे उद्ध्वस्त केली आहेत. चिकलठाणा भागात ट्रकच्या धडकेत एका ३१ वर्षांच्या तरुणाचा जागीच अंत झाला, तर सातारा परिसरात मद्यधुंद जेसीबी चालकाने गल्लीत खेळणाऱ्या ९ वर्षांच्या चिमुकल्याला चिरडले. या दोन्ही घटनांमुळे शहरभर हळहळ आणि संतापाची लाट उसळली आहे.

नारेगावच्या अजीज कॉलनीतील शहबाज कमरोद्दीन बागवान (३१) हा तरुण रविवारी सकाळी १०:३० च्या सुमारास आपल्या मोपेडवरून कामावर निघाला होता. चिकलठाणा आठवडी बाजार परिसरात पाठीमागून येणाऱ्या काळरूपी भरधाव ट्रकने त्याच्या मोपेडला जोरदार धडक दिली. ही धडक इतकी भीषण होती की, शहबाज रस्त्यावर फेकला गेला आणि त्याच्या डोक्याला गंभीर इजा झाल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला.

या घटनेचा एक व्हिडिओ समोर आला आहे. त्यात बागवान हा ट्रकच्या अगदी पुढे पडल्यानंतर ट्रकचे समोरील चाक त्यांच्या अंगावरून जाताना दिसून येत आहे.

शहबाज हा जुन्या वाहनांच्या खरेदी-विक्री दुकानात फायनान्सचे काम करायचा. त्याच्या पश्चात आई-वडील, एक भाऊ आणि अवघ्या सहा महिन्यांची चिमुकली मुलगी आहे. ज्या वयात पित्याने लेकीला बोटाला धरून चालायला शिकवायचे त्याच वयात तिच्या डोक्यावरचे छत्र हरपल्याने नारेगाव परिसरात शोककळा पसरली आहे. एमआयडीसी सिडको पोलिसांनी या घटनेची नोंद केली.

## हिंगोलीच्या तहसील कार्यालयातील शिपाई तडकाफडकी निलंबित

### पोलिस पाटील नियुक्तीसाठी पैशाची मागणी करीत असल्याचे उघड

हिंगोली। प्रतिनिधी

हिंगोली तालुक्यातील पोलिस पाटील पदाच्या भरती प्रक्रियेत उमेदवार व त्यांच्या नातेवाईकांशी संपर्क करून पैशाची मागणी करीत असल्याच्या आरोपावरून हिंगोली तहसील कार्यालयातील शिपायास तडकाफडकी निलंबीत करण्यात आले असून त्यांच्या निलंबनाचे आदेश जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी शनिवारी ता. ७ काढले आहेत. हिंगोली जिल्हयात पोलिस पाटील पदाची भरती प्रक्रिया सुरु आहे. सदर भरती प्रक्रिया पूर्णपणे पारदर्शक करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी दिल्या आहेत.

त्यानुसार या भरती प्रक्रियेवर जिल्हाधिकारी गुप्ता, अप्पर जिल्हाधिकारी कांबळे, उपविभागीय अधिकारी समाधान घुटुकडे, विकास माने, प्रतिक्षा भुते यांच्या पथकाकडून विशेष लक्ष दिले जात आहे. या शिवाय या भरती प्रक्रियेत कोणाच्याही प्रलोभनाला बळी पडू नये असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे. दरम्यान, हिंगोली तहसील कार्यालयातील शिपाई भिमा रंगनाथ झेंडे हे पोलिस पाटील पदाची प्रक्रिया सुरु असतांना उमेदवारी अर्ज दाखल केलेल्या उमेदवार व त्यांच्या नातेवाईकांशी संपर्क साधून या पदावर निवड करण्यासाठी पैशाची मागणी करीत असल्याची बाब समोर आली होती. त्याबाबत तक्रारी प्राप्त झाल्यानंतर या संदर्भात तहसीलदार श्रीकांत भुजबळ यांनी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठविला होता. त्या अहवालावरून जिल्हाधिकारी गुप्ता यांनी हिंगोली तहसील कार्यालयातील शिपाई झेंडे यास निलंबीत केले आहे.

## ४५ वर्षांनंतर परतूरच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा

### जिल्हा परिषद प्रशालेच्या १९८१ सालच्या दहावीचे माजी विद्यार्थी आले एकत्र

परतूर। प्रतिनिधी

येथील जिल्हा परिषद प्रशालेच्या १९८१ सालच्या इयत्ता दहावीच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा शुक्रवारी मोठ्या उत्साहात संपन्न झाला. तब्बल ४५ वर्षांनी सर्व वर्गमित्र एकत्र आले होते. जीवन जगताना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. यातून बाहेर येण्यासाठी माणसाला संघर्ष करावा लागतो. यातून अनेकदा मानसिक थकवा जाणवतो. मानसिक थकव्यातून बाहेर येण्यासाठी मित्रांसोबत घालवलेला वेळ महत्त्वाचा ठरतो. याच विचारातून दीपककुमार अग्रवाल, नंदकिशोर जेथलीया, दीपक कुलकर्णी, कृष्णा कवडी, विश्वंभर खोसे, अशोक सेवलीकर, सोपान शेळके, अरुण कापसे आदींनी पुढाकार घेतला आणि हा मेळावा प्रत्यक्षात साकारला गेला. तब्बल ४५ वर्षांनी एकत्र आल्याने एका वेगळ्या विश्वासाचा अनुभव आल्याचे बहुतांश मित्रांनी सांगितले.

मंगल जाजू, सुनीता अग्रवाल, उषा



कोटेकर, सत्यवर्ती कदम, चंद्रा होलानी यांच्यासह इतर वर्गमैत्रिणींची संख्या देखील दखलपात्र होती. सुना, जावई, नातू, पणतू आलेल्या वयात पुन्हा एकदा शाळेचा अनुभव घेता आल्याने सर्वजण सुखावले होते.

शालेय परिपाठाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. तत्कालीन शिक्षक काशिनाथ सोरेकर आणि एम.आर. खरात यांच्या उपस्थितीत शालेय परिपाठ पूर्ण झाला. यावेळी शिक्षकांचीही उपस्थिती होती. दरवर्षी एकत्र येण्याचा करण्यात आला संकल्प दिवसभर विविध खेळ आणि मनोरंजनपर उपक्रमात सर्व वर्गमित्र उत्साहाने सहभागी झाले होते.

सर्वांनी एकत्र स्नेहभोजन घेत जुन्या आठवणींना उजाळा दिला. आपापल्या जीवनातील चांगले-वाइट अनुभव एकमेकांपुढे व्यक्त केले. यापुढे दरवर्षी वर्षातून एकदा भेटण्याचा संकल्प करत सर्वांनी निरोप घेतला.

जाहिर प्रगटन

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**

दुरध्वनी क्रमांक : ०२४८३-२७५०२६
जा..क्र.२०२५/ सेतु/कावि-१५३६
दिनांक - १६/१२/२०२५

तहसिलदार तथा कार्यकारी दंखाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान/श्रीमती रुपाप्रसाद जगतप्रसाद जोशी रा. अंबड ता. अंबड जि. जालना यांनी यांच्या स्वतः जन्म /मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | रोशनी रुपाप्रसाद जोशी | मुलगी | १५/०७/२०२१ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित**
**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

## जिल्हा क्रिकेट संघटनेतील वाद पेटला:घटनाबाह्य लोकांचा एडीसीएवर कब्जा -बोराळकर

### जिथे जाईल तिथे वाटोळे करणारा व्यक्ती पक्षानेही बाजूला सारला -मुळे

छत्रपती संभाजीनगर। प्रतिनिधी

औरंगाबाद जिल्हा क्रिकेट संघटनेमधील (एडीसीए) पदाधिकाऱ्यांचा वाद चव्हाट्यावर आला आहे. आता संघटनेतील कार्यकारिणीत एकत्र बसणारे पदाधिकारी एकमेंकावर आरोप करत आहेत. 'घटनाबाह्य लोकांनी एडीसीएवर कब्जा आहे. आपली खाजगी प्रायव्हेट लिमिटेड कंपनी बवण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. हुकुमशाही पद्धतीने काम सुरू असून त्यांच्या विरोधात न्यायालयात जाणार आहे. तसचे धर्मदाय आयुक्तांकडे एडीसीएवर प्रशासक नेमण्याची व आर्थिक व्यवहाराची चौकशी करण्याची मागणी करण्यात येईल. युवा खेळाडूंवर अन्याय केला जात असल्याचा आरोप जिल्हा क्रिकेट संघटनेचे सहसचिव शिरिष बोराळकर यांनी केला.' त्याला उत्तर देताना जिल्हा संघटनेचे सचिव सचिन मुळे यांनी सर्व आरोप फेटाळून लावले. वाद घालणाऱ्याकडे दुर्लक्ष करत चांगले काम करत राहणार असल्याचे स्पष्ट केले.

बोराळकर म्हणाले की, महाराष्ट्र क्रिकेट



संघटनेच्या विरोधात आंतरराष्ट्रीय खेळाडू केदार जाधवने आवाज उठवल्याने एमसीएवर प्रशासक नेमण्यात आला. त्यामुळे मला देखील प्रेरणा मिळाली. एडीसीएच्या हुकुशाही व्यक्तींच्या विरोधात उभा राहिले. एक टोळी संघटना चालवत आहे. मी संघटनेत पदाधिकारी आहे मात्र, २०१६ पासून संघटनेपासून दूर असून कुठेच सहभागी नाही. खेळ, मैदान, खेळाडूंच्या भल्यासाठी मी मैदानात उतरलो. संघटनेत परादर्शकता नाही. केवळ जवळच्या व्यक्ती संधी दिली जाते. इतरांना डावलले जात आहे. दुसरीकडे, सचिन मुळे यांनी बोराळकरांनी केलेले सर्व आरोप फेटाळून लावलेत. ते म्हणाले, बोराळकर यांनी केलेले सर्व आरोप बिनबुडाचे आहेत. ते स्वत: काम करत नाही, इतरांना करुन देत नाही, वाद घालत राहतात. स्वत:ची बॅडमिंटन संघटना संभाळता येत नाही, त्याचे वाटोळे केले आहे. त्यांच्या पक्षात आता त्यांना किमंत राहिली नाही, त्यांना बाजूला केल्याने ते रिकामे झाले आहेत. आर्थिक व्यवहाराचे बोलायचे झाले तर, निवडणूका झाल्या नसल्या तरी नियमाने चालू पदाधिकारी सर्व कामकाज पाहतात. संघटना वाऱ्यावर सोडता येत नसते. असे असते तर काही मोजक्या संघटना सोडता सर्वच खेळांच्या संघटना बंद पडल्या असत्या.राम भोगले गेल्या ३५ वर्षापासून क्रिकेट संघटनेत आहेत. त्यांनी खेळ व खेळाडूंसाठी काहीच केले नाही. केवळ पद व प्रतिष्ठा हवी आहे. त्यांनी राजीनामा दिल्याचे कोणालाच माहिती नाही. एकही अकादमी सुरू झाली नाही. आपल्या खेळाडूंना दुसऱ्या जिल्ह्याकडून खेळण्याचा गंभीर सल्ला काही पदाधिकाऱ्यांकडून दिला जातोय. आपली गुणवत्ता जिल्हा बाहेर पाठवली जातेय. सचिन मुळे विरोध करणाऱ्या लोकांना छोटी पदे देऊन शांत करण्याचे काम केले जाते.



## भायडी शाळेतील बालधमाल कार्यक्रमास मिळाला प्रतिसाद

दानापूर। प्रतिनिधी

भोकरदन तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा भायडी येथे बालधमाल २०२६ कार्यक्रम उत्साहात पार पडला. या कार्यक्रमात तालुक्यातील शिक्षक, पालक आणि रसिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीत, हिंदी-मराठी गाणी, एकांकिका, एकपात्री सादरीकरण केले. दारूबंदी, स्वच्छता अभियान, अंधश्रद्धा, पाणीवापर यासारख्या सामाजिक विषयांवर अभिनय सादर केला. नृत्य आणि अभिनयाने प्रेक्षकांना खळखळून हसवले. कार्यक्रमासाठी सरपंच रेखा जंजाळ, उपसरपंच गंगा दसपुते, विष्णू जंजाळ, कृष्णा जंजाळ, रुख्मण फरकाडे, केंद्रप्रमुख डी.पी. वाघ, प्रा. नंदकुमार गिऱ्हे, चेअरमन संतोष इंगळे, शेनफड नेव्हार, प्रदीप इंगळे, आर्यन इंगळे, विठ्ठल घायाळ, भास्कर कढवणे, केंद्रीय मुख्याध्यापक दीपक जाधव, पुंडलिक सोनूने यांच्यासह शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.विद्यार्थ्यांच्? या सादरीकरणाचे पालकांकडून विशेष कौतुक करण्यात आले.

# सुकळी पुनर्वसनाचा प्रश्न पेटला !

## गुणवती तलावाच्या भिंतीच्या पायथ्याशी ग्रामस्थांचे आमरण उपोषण सुरू, वयोवृद्ध, महिला मोठ्या संख्येने आंदोलनात सहभागी

किल्लेधारूर । प्रतिनिधी

धारूर तालुक्यातील मौजे सुकळी येथील पुनर्वसित ग्रामस्थांनी अखेर संयमाचा बांध तोडत आजपासून गुणवती लहू पाटबंधारे प्रकल्पाच्या भिंतीच्या पायथ्याशी आमरण उपोषणाला सुरुवात केली आहे. जुन्या गावातील मूल्यांकनानुसार मावेजा आणि मूलभूत नागरी सुविधा अद्याप न मिळाल्याने संतप्त ग्रामस्थ रस्त्यावर उतरले असून, या उपोषणात वयोवृद्ध ज्येष्ठ नागरिक व महिलांचा मोठ्या प्रमाणावर सहभाग दिसून येत आहे.

सुकळी गावाचा पुनर्वसनाचा निर्णय 'विशेष बाब' म्हणून घेण्यात आला होता. शासन निर्णय व गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाच्या विविध पत्रांनुसार ग्रामस्थांना आर्थिक मावेजा तसेच रस्ते, पाणीपुरवठा, वीज, नाली-गटार, प्रशासकीय इमारत यांसारख्या नागरी सुविधा देणे बंधनकारक असताना प्रत्यक्षात कोणतीही ठोस अंमलबजावणी झालेली नाही, असा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. वारंवार निवेदने, पाठपुरावा व आश्वासने देऊनही प्रशासनाकडून केवळ वेळकाढूपणा होत असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. पुनर्वसित




ठिकाणी रस्ते व पिण्याच्या पाण्याची सुविधा, वीज व शासकीय इमारत नसल्याने तेथे वास्तव्यास राहणे अशक्य झाले असून, या दिरंगाईमुळे ग्रामस्थांचे जीवनमान पूर्णतः कोलमडल्याची भावना आंदोलनकर्त्यांनी व्यक्त केली. आज सुरू झालेल्या आमरण उपोषणात महिलांसह वृद्ध नागरिक सहभागी झाल्याने आंदोलनाला तीव्र स्वरूप प्राप्त झाले आहे. मागण्या तातडीने मान्य न झाल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशाराही ग्रामस्थांनी दिला आहे. दरम्यान, या आंदोलनादरम्यान कोणतीही अनुचित घटना किंवा कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी जलसंपदा विभाग व संबंधित प्रशासनाची राहील, असे स्पष्ट करण्यात आले आहे.या प्रकरणाची माहिती जिल्हाधिकारी बीड, मुख्य अभियंता (छत्रपती संभाजीनगर), खासदार बजरंग बाप्पा सोनवणे, आमदार प्रकाश दादा सोळंके तसेच पोलीस प्रशासनाला देण्यात आली असून, प्रशासन या गंभीर प्रश्नाकडे कोणती भूमिका घेते याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

## बदामराव पंडित यांच्या प्रयत्नाला यश; अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालयाला मान्यता, गेवराई कोर्टाची इमारत होणार दुमजली

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील शेतकरी, कष्टकरी आणि सामान्य नागरिक पक्षकारांना सुलभ सत्वर, तत्पर, अत्यल्प त्रासात व अत्यल्प खर्चात न्याय मिळावा यासाठी गेवराई येथील अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालयाची नव्याने स्थापना करून कोर्टाची इमारत दुमजली करण्याची मागणी भाजपाने ते माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली होती. या मागणीला यश आले असून गेवराई जिल्हा आणि अतिरिक्त सत्र न्यायाधीशांच्या न्यायालयाची स्थापना करण्याची मान्यता मिळाली आहे. आता लवकरच कोर्टाची इमारत दुमजली होणार आहे.



याबाबत अधिक माहिती अशी की, भाजपा नेते माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांनी ८ ऑक्टोबर २०२५ रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन देऊन, बीड येथील जिल्हा व सत्र न्यायालय प्रलंबित असलेली गेवराई तालुक्यातील दिवाणी स्वरूपाची सर्व प्रकारची व फौजदारी स्वरूपाची सर्व प्रकारची मिळून अंदाजे ५०० पेक्षा जास्त प्रकरणे न्यायप्रविष्ठ असल्याचे म्हटले होते. गेवराई तालुक्यातील बहुतांश गावे बीड न्यायालयात असून अंदाजे १२० ते १३० किलोमीटर अंतरावर वसलेली आहेत. त्यामुळे पक्षकारांना बीड येथे जाण्या येण्यासाठी अत्यंत त्रासदायक, गैरसोयीचे, खर्चिक व असुविधायुक्त होत आहे. त्यामुळे न्याय मिळवताना पक्षकाराचे अत्यंत गैरसोय होत आहे. न्यायालयीन कामासाठीही त्यांना वेळेवर पोहोचता येत नाही. त्यामुळे त्यांच्यावर अन्याय होऊन पक्षकारांना शारीरिक, मानसिक व आर्थिक त्रास सहन करावा लागतो व वेळप्रसंगी अधिकचा दंड सहन करावा लागतो असे सांगून, गेवराई तालुक्यातील पक्षकारांना सुलभ, सत्वर, तत्पर, अत्यल्प त्रासात व अत्यल्प खर्चात न्याय देण्यासाठी गेवराई येथे अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालय स्थापन करावे अशी ◀◀ पान ३ वर

## यूडी-आयडी शिबिर अचानक रद्द; ग्रामीण रुग्णालयासमोर दोन तास निदर्शने करणार-थावरे

माजलगांव । प्रतिनिधी

माजलगाव येथील ग्रामीण रुग्णालयात महिन्याच्या प्रत्येक सोमवारी अपंग प्रमाणपत्र (यूडी-आयडी) देण्यासाठी तज्ज्ञ डॉक्टरांच्या उपस्थितीत आयोजित करण्यात येणारे शिबिर अचानक स्थगित करण्यात आल्याने दूरदूरच्या भागातून आलेल्या शेकडो रुग्णांची मोठी गैरसोय झाली. या घटनेच्या निषेधार्थ शेतकरी संघर्ष समितीच्या वतीने ९ फेब्रुवारी रोजी ग्रामीण रुग्णालयासमोर दोन तास निदर्शने करण्याचा इशारा देण्यात आला आहे.



सोमवारी आयोजित शिबिरासाठी अनेक रुग्ण स्वतःचा खर्च करून सकाळपासून ग्रामीण रुग्णालयात उपस्थित झाले होते. मात्र शिबिर अचानक स्थगित करण्यात आल्याची माहिती नंतर देण्यात आल्याने अनेकांना रिकाम्या हाताने परत जावे लागले. त्यामुळे त्यांच्या वेळेचा तसेच पैशांचा अपव्यय झाला आहे. शेती व रोजगाराची कामे सोडून आलेल्या सामान्य नागरिकांची झालेली ही हेळसांड गंभीर असल्याचे ◀◀ पान ३ वर

## आ.धस यांच्या वाढदिवसानिमित्त परिवंत गायकवाड यांच्यातर्फे गणवेश व शालेय साहित्य वाटप सोहळा

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी,पाटोदा, शिरूर विधानसभा मतदार संघाचे आमदार,लोकनेते व मराठवाडा भूषण मा. सुरेशर (अण्णा) धस यांच्या वाढदिवसानिमित्त सामाजिक बांधिलकी जपत आष्टी येथील पीएम श्री जिल्हा परिषद कन्या प्रशाला येथे विद्यार्थिनींसाठी गणवेश व शालेय साहित्य वाटप सोहळ्याचे शनिवार दि. १४ फेब्रुवारी रोजी सकाळी ९ वाजता आयोजन करण्यात आले आहे.आष्टीच्या पीएम श्री कन्या प्रशालेत आ.सुरेश धस यांच्या हस्ते होणार वाटप आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी क-हेवाडीचे सरपंच तथा कडा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संचालिका सौ. वंदना परिवंत गायकवाड या राहणार आहेत.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून कडा कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती रमजान तांबोळी, आष्टीचे माजी नगराध्यक्ष रंगनाथ धोंडे,रिपाईचे नेते अरुणभैय्या निकाळजे, गणेश नाना शिंदे,सरपंच सौ.शालन अशोक मुळे,आष्टीचे नगराध्यक्षाच्या जियाभाई बेग, उपनगराध्यक्ष शैलेश सहस्रबुद्धे, नगरसेवक सुरेश वारंगुळे, कड्याचे माजी सरपंच रामशेठ मधुरकर, ज्येष्ठ पत्रकार प्रफुल्ल सहस्रबुद्धे, झुंजारनेताचे उपसंपादक उत्तम बोडखे,संतोष सानप,अविनाश कदम,अविशांत कुमकर,मिलिंद निकाळजे,दीपक निकाळजे,रुपेश निकाळजे,राजु निकाळजे, मुख्याध्यापक आबासाहेब खताळ, ज्येष्ठ शिक्षक सतीश दळवी यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. सर्व पत्रकार बांधव मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन राजेंद्र लाड करणारआहेत. देविदास शिंदे हे आभार मानणार आहेत. कार्यक्रमानंतर उपस्थितांसाठी अल्पोपहाराचे वाटप करण्यात येणार आहे.शिक्षण ◀◀ पान ३ वर

## म.गां.ग्रा.रो.यो.अंतर्गत नवीन कामांना मान्यता बंद

कडा । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यात महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजना (म.गा.ग्रा.रो.यो.) अंतर्गत सध्या कोणत्याही नवीन कामांना प्रशासकीय मान्यता देणे बंद करण्यात आले आहे. यामध्ये जलसिंचन विहीर, शेततळे, शेळीपालन शेड, वृक्ष लागवड, फळबाग लागवड आदी सर्व कामांचा समावेश आहे.

केंद्र शासनाकडून सदर कामांचे सांकेतांक (वर्क कोड) काढण्याची प्रक्रिया सध्या थांबविण्यात आल्यामुळे नवीन कामांना मंजुरी देता येणार नसल्याची माहिती पंचायत समिती आष्टीचे गट विकास अधिकारी गोकुळ बागलाने यांनी दिली आहे.

या पार्श्वभूमीवर तालुक्यातील लाभार्थी व नागरिकांनी कोणत्याही आर्थिक प्रलोभनाला बळी पडू नये तसेच दलालांच्या व काही पंचायत समितीतील कर्मचारी यांच्या आमिषाला बळी पडू नये, असे स्पष्ट आवाहन गटविकास अधिकारी बागलाने यांनी केले आहे. याबाबत कोणीही पंचायत समिती आष्टी येथे कोणतेही प्रस्ताव दाखल करू नयेत, असेही त्यांनी आवाहन लाभार्थी व नागरिक यांना केले आहे.

## कर्जतच्या आदर्श पत्रकार संघ पुरस्कार कार्यक्रमाला उपस्थित रहा

### विभागीय सचिव रवी उबाळे, समन्वयक सुभाष चौरे ,राज्य कार्यकारणी सदस्य विलास डोळसे यांचे आवाहन

बीड । प्रतिनिधी

मराठी अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेच्या पत्र महर्षी रंगा आण्णा वैद्य आदर्श जिल्हा व वसंतराव काणे आदर्श तालुका पुरस्कार वितरण कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आवाहन संभाजीनगर विभागाचे विभागीय सचिव रवी उबाळे विभागीय समन्वयक सुभाष चौरे, राज्य कार्यकारणी सदस्य विलास डोळसे यांनी केले आहे.

अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे आदर्श जिल्हा व तालुका पुरस्कार वितरण कर्जत येथे दिनांक २२ फेब्रुवारी रोजी रविवारी रायगड जिल्ह्यातील कर्जत येथे रॉयल गार्डन मध्ये सकाळी ११ वाजता आदर्श जिल्हा व तालुका पत्रकार संघाचे पुरस्कार वितरण होणार आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस. एम. देशमुख सर हे राहणार आहेत. या कार्यक्रमाला संभाजीनगर विभागातील सर्व तालुका आणि जिल्हा पत्रकार संघाने उपस्थित राहावे असे आवाहन संभाजीनगरचे विभागीय सचिव रवी उबाळे ,विभागीय समन्वयक सुभाष चौरे, राज्य कार्यकारणी सदस्य विलास डोळसे यांनी केले आहे.

## जिल्हाधिकारी कार्यालयासमोर हेल्मेट घालून लक्षवेधी सत्याग्रह आंदोलन

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्हा अपघातमुक्त करण्यासाठी जिल्हा प्रशासनाने दुचाकीस्वारांसाठी हेल्मेट वापर सक्तीचा निर्णय घेतला आहे. हा निर्णय निश्चितच स्वागतार्ह असला तरी, अपघातांची प्रमुख कारणे ठरणाऱ्या निकृष्ट व रखडलेल्या राष्ट्रीय महामार्गांच्या कामांकडे प्रशासन जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत आहे, असा गंभीर आरोप सामाजिक कार्यकर्त्यांनी केला आहे.



बीड ते अहिल्यानगर, बीड ते परळी, माजलगाव ते तेलगाव, मांजरसुंभा ते लोखंडी सावरगाव तसेच पाटोदा तालुक्यातील पाटोदा ते अनपटवाडी या राष्ट्रीय महामार्गांवरील रस्त्यांची अवस्था अत्यंत दयनीय असून, कामांचा दर्जा निकृष्ट असल्याबाबत ग्रामस्थ व सामाजिक कार्यकर्त्यांनी पुराव्यासह लेखी तक्रारी सादर केल्या आहेत.

तरीही राष्ट्रीय महामार्ग विभाग लातूरचे विभागीय कार्यकारी अभियंता प्रविण सुमंत आणि राष्ट्रीय महामार्ग उपविभाग बीडचे उपविभागीय अभियंता राजेंद्र भोपळे हे चौकशी करण्याऐवजी कंत्राटदारांची बाजू घेत दर्जेदार काम असल्याचे प्रमाणपत्र देत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. यामुळे नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. या पार्श्वभूमीवर बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचे मुख्य प्रचार प्रमुख डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांच्या नेतृत्वाखाली आज जिल्हाधिकारी कार्यालयासमोर हेल्मेट घालून लक्षवेधी सत्याग्रह आंदोलन करण्यात आले. आंदोलनादरम्यान प्रशासनाच्या दुटप्पी भूमिकेविरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली आणि निकृष्ट रस्ताकाम करणाऱ्या कंत्राटदारांवर तसेच जबाबदार अधिकाऱ्यांवर कठोर प्रशासकीय व दंडात्मक कारवाई करण्याची मागणी करण्यात आली.बीड शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक ते नगरनाका दरम्यान दुभाजकात ◀◀ पान ३ वर

## देशपातळीवरील महापशुधन एक्स्पोला मोठ्या संखेने सहभाग घ्यावा-राजेश गित्ते

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

परळी वैजनाथ येथे आयोजित करण्यात येत असलेल्या महापशुधन एक्स्पो-२०२६ या अखिल भारतीय पशुपक्षी प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. ना.पंकजाताई मुंडे यांच्या संकल्पनेतून होणाऱ्या देशपातळीवरील महापशुधन एक्स्पो-२०२६ या भव्य या प्रदर्शनाच्या माध्यमातून राज्यातील आणि देशातील पशुपालकांना आधुनिक तंत्रज्ञानाची जोड मिळावी म्हणून आयोजित करण्यात आले आहे. ना.पंकजाताई मुंडे यांच्या संकल्पनेतून होणाऱ्या परळी वैद्यनाथ येथील देशपातळीवरील महापशुधन एक्स्पो-२०२६ या भव्य प्रदर्शनाचा शेतकरी व पशुपालकांनी मोठ्या संखेने सहभाग घ्यावा असे आवाहन भाजपचे तालुकाध्यक्ष राजेश गित्ते व सर्व पदाधिकारी यांनी केले.





महापशुधन एक्स्पो-२०२६ या अखिल भारतीय पशुपक्षी प्रदर्शनाचे उद्घाटन समारंभ शुक्रवार दि. १३ फेब्रुवारी, २०२६ । सकाळी ११:०० वाजता मा. ना. श्रीमती पंकजा प्रज्ञा गोपीनाथ मुंडे मंत्री, पशुसंवर्धन, पर्यावरण व वातावरणीय बदल, महाराष्ट्र राज्य यांच्या शुभ हस्ते होणार तर बक्षीस वितरण समारंभ रविवार, दि. १५ फेब्रुवारी, २०२६ । दुपारी १:०० वाजता मा. ना. श्री. देवेंद्र सरिता गंगाधरराव फडणवीस मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या शुभ हस्ते होणार आहे. सन्माननीय उपस्थिती मा. ना. श्री. एकनाथ गंगुबाई संभाजी शिंदे, उप मुख्यमंत्री, नगरविकास, गृहनिर्माण, सार्वजनिक बांधकाम, महाराष्ट्र राज्य, मा. ना. श्रीमती सुनेत्रा अजित पवार उप मुख्यमंत्री, राज्य उत्पादन शुल्क, क्रीडा व युवक कल्याण, अल्पसंख्यांक विकास व औकाफ, महाराष्ट्र राज्य तथा पालकमंत्री बीड, मा. ना. श्रीमती पंकजा प्रज्ञा गोपीनाथ मुंडे मंत्री, पशुसंवर्धन, पर्यावरण व वातावरणीय बदल, महाराष्ट्र राज्य, मा. ना. श्री. अतुल लिलावती मोरेश्वर सावे मंत्री, दुग्धविकास व इतर मागास बहुजन कल्याण, मा. ना. श्री. नितेश नीलम नारायण राणे मंत्री, मत्स्य व्यवसाय व बंदरे यांची उपस्थित लाभणार ◀◀ पान ३ वर

## शनी मंदिराच्या प्रवेशद्वारावर जिल्हा अधीक्षकांकडून गोंधळ; भक्तांची गैरसोय

### प्रवेशद्वार अडवल्याने भाविकांना दर्शनासाठी प्रतीक्षा करावी लागली, विश्वस्तांच्या अनुपस्थितीत स्थळ पाहणीचा प्रयत्न; प्रक्रियात्मक नियमांचे उल्लंघन असल्याचा आरोप

बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील ऐतिहासिक शनी मंदिर देवस्थानाच्या मुख्य प्रवेशद्वाराजवळ दिनांक ९ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ४ ते ६.३० या वेळेत गोंधळाची परिस्थिती निर्माण झाल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या घटनेमुळे मंदिराचे दर्शन गेट नियोजित वेळेत उघडता न आल्याने अनेक भाविकांना दर्शनासाठी प्रतीक्षा करावी लागली, त्यामुळे भक्तांची मोठी गैरसोय झाली.

मिळालेल्या माहितीनुसार, शनी मंदिर देवस्थानाच्या जागेसंदर्भातील प्रकरण हे तीन महिन्यांपूर्वीच ''आदेशासाठी बंद'' करण्यात आले आहे. असे असतानाही कोणताही लेखी आदेश अथवा न्यायालयीन निर्देश नसताना जिल्हा अधीक्षक शिंदे यांनी स्थळ पाहणी करण्याचा निर्णय घेतल्याचा आरोप करण्यात आला आहे. या निर्णयाविरोधात विश्वस्त मंडळाने वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे तसेच जिल्हा अधीक्षकांकडे आक्षेप अर्ज व तक्रारी दाखल केल्या होत्या. मात्र, त्याची कोणतीही दखल न घेता ही कारवाई करण्यात आल्याने परिस्थिती चिघळली. महत्त्वाची बाब म्हणजे, याच वेळेत देवस्थानचे अध्यक्ष न्यायालयीन कामकाजासाठी छत्रपती संभाजीनगर येथे उपस्थित होते. अध्यक्ष व विश्वस्त मंडळाच्या अनुपस्थितीत मंदिराच्या मुख्य प्रवेशद्वाराजवळ लोकांचा जमाव जमवून गोंधळ घातल्याने परिसरात तणाव निर्माण झाल्याचे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले. या घटनेमुळे भक्तांच्या धार्मिक भावना दुखावल्या असून देवस्थानच्या व्यवस्थापनाबाबत संभ्रम निर्माण झाला आहे. सदर संपूर्ण प्रकार मंदिराच्या ऑनलाईन कॅमेऱ्यांमध्ये कैद झाला असून संबंधित फुटेज वरिष्ठ अधिकाऱ्यांना दाखवण्यात आल्याची माहिती आहे. तसेच, आदेशासाठी बंद असलेल्या प्रकरणात ◀◀ पान ३ वर



## बीड जि.प. साठी भाजपची रणनीती ठरली पंकजाताईंची बदामराव पंडितांनी घेतली भेट

गेवराई । प्रतिनिधी

बीड जिल्हा परिषदेसह गेवराई पंचायत समितीची लवकरच निवडणूक जाहीर होणार असल्याच्या पार्श्वभूमीवर भाजपा नेते माजी राज्यमंत्री बदामराव पंडित आणि भाजपा युवानेते युधाजित पंडित यांनी मुंबई येथे राज्याच्या ग्रामविकास व महिला बालकल्याण मंत्री पंकजाताई मुंडे यांची रामटेक येथे जाऊन भेट घेतली. यावेळी गेवराई तालुक्यातील जि प आणि पं स च्या निवडणुकी संदर्भात सविस्तर चर्चा झाल्याचे समजते.



गेवराई तालुक्यात माजी राज्यमंत्री बदामराव पंडित आणि युवा नेते बाळराजे पवार यांनी भाजपा मध्ये एकत्रितपणे काम करण्याचा निर्णय घेतल्यानंतर, पहिल्याच झालेल्या गेवराई नगर परिषदच्या निवडणुकीत घवघवीत यश मिळवत ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...
पुणे विशेष
मंगळवार दि.१० फेब्रुवारी २०२६ । पान ७

# महाराष्ट्रासाठी दोन्ही राष्ट्रवादींनी एकत्र यावं! सयाजी शिंदे सुनेत्रा वाहिनींसह मोठ्या साहेबांना भेटले

**पुणे । प्रतिनिधी**

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे विमान अपघातात निधन झाले. अजित दादांच्या निधनानंतर त्यांच्या पत्नी सुनेत्रा पवार महाराष्ट्राच्या उपमुख्यमंत्री झाल्या आहेत. अजित दादांच्या अकाली निधनाने संपूर्ण महाराष्ट्रात विशेषतः राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये मोठी पोकळी निर्माण झालीय ही पोकळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाबरोबर ज्येष्ठ नेते खा. शरद पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षालाही जाणवत राहणार आहे. त्यामुळेच दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या विलीनीकरणाची उलटसुलट चर्चा सध्या सुरू आहे. दरम्यान, महाराष्ट्राच्या भविष्यासाठी दोन्ही राष्ट्रवादींनी एकत्र यावं असं अभिनेते सयाजी शिंदे म्हणाले आहेत. आज सुनेत्रा वाहिनी यांच्यासह मोठ्या साहेबांना भेटल्याचंही त्यांनी सांगितलं. अजित दादांच्या जाण्याने



महाराष्ट्र निःशब्द झालाय.काहीतरी सुचावं यालादेखील वेळ जातोय. काही सुचत नाही. आज सुनित्रा वहिनींची भेट घेतली. काय बोलावं काही कळत नव्हत.त्यानंतर मोठ्या साहेबांचीसुधा भेट घेतली. मला असं वाटतंय की महाराष्ट्राच्या भल्यासाठी दोन्ही राष्ट्रवादी एकत्र याव्यात. खरंतर अशी चर्चा झाली होती, निवडणुकीच्या वेळेला, प्रचाराच्या वेळेला की आता एकत्रच येणार आहे. आता फक्त औपचारिकता राहिलीय. हे होत असताना असं अचानक काहीतरी व्हावं हे महाराष्ट्राच्या दृष्टीने फार वाईट झालं. दादांचा जो उमदा स्वभाव, निर्णय घेण्याचा स्वभाव पुन्हा महाराष्ट्रात यावा या दृष्टीने दादाचं स्वप्न पूर्ण व्हावं. आणि ताकद वाढवायची असेल तर दोन्ही राष्ट्रवादीने एकत्र यावं. यानिमित्ताने मला हे सांगावंसं वाटतं. झालेल्या दुःखावर आपण काही बोलू शकत नाही सध्या. कोणीच काही बोलू शकत नाही. असं अभिनेते सयाजी शिंदे म्हणाले.

शरद पवारांचे आमदार रोहित पवारांनी येत्या १२ तारखेला पत्रकार परिषदेत मोठा खुलासा करणार असल्याचं म्हटलं आहे. सुनील शेळके अजितदादांची पवार कुटुंब आणि शरद पवार राष्ट्रवादीच्या नेत्यांशी विलीनीकरणाची चर्चा झाली असेल, असे म्हणाले. दादांच्या अचानक जाण्याने मीटिंग कोणी बोलवायची? जर सुनील तटकरे प्रदेशाध्यक्ष आहेत आणि प्रफुल्ल पटेल कार्याध्यक्ष आहेत, तर त्यांनी जबाबदारीने पाऊल उचलले तर ते 'व्हिलन' कसे ठरू शकतात? असा सवाल वैद्यकीय शिक्षणमंत्री हसन मुश्रीफ यांनी व्यक्त केला. ज्या नेत्याने मला ३०-४० वर्षे सांभाळले, त्यांच्या निधनानंतर मी जे सत्य घडले तेच बोललो आहे, असे मुश्रीफ यांनी स्पष्ट केले.

# २.१५ लाख अर्जदार अन् ४१८६ घरं! कोणाचं नशीब उघडणार? आज दुपारी १२ वाजता लागणार पुणे म्हाडाच्या घरांचा 'जॅकपॉट'

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे, पिंपरी-चिंचवडसह सांगली, सोलापूर आणि कोल्हापूर जिल्ह्यातील म्हाडाच्या घरांचे स्वप्न पाहणाऱ्या हजारो नागरिकांची प्रतीक्षा अखेर संपणार आहे. म्हाडाच्या पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळांतर्गत विविध गृहनिर्माण प्रकल्पांतील ४,४८६ सदनिकांची संगणकीय सोडत मंगळवार, १० फेब्रुवारी २०२६ रोजी दुपारी १२.०० वाजता काढली जाणार आहे.




पुणे जिल्हा परिषदेच्या शरदचंद्र पवार सभागृहात हा कार्यक्रम संपन्न होणार असून, पुणे मंडळाचे सभापती शिवाजीराव आढळराव पाटील यांच्या हस्ते ही सोडत काढण्यात येईल. या कार्यक्रमाला म्हाडाचे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी संजीव जयस्वाल (भा.प्र.से.) हे मुंबईहून व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे उपस्थित राहणार आहेत. पुणे मंडळाच्या या सोडतीला सर्वसामान्यांनी भरघोस प्रतिसाद दिला आहे. एकूण ४,१८६ सदनिकांसाठी २,५८,८३२ अर्ज प्राप्त झाले होते. त्यापैकी २,१५,९६५ अर्जदारांनी विहित मुदतीत अनामत रकमेचा (एचऊ) भरणा केला असून, केवळ याच पात्र अर्जदारांचा समावेश उद्याच्या अंतिम सोडतीत केला जाणार आहे.

पुणे, पिपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील तसेच पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अंतर्गत २० टक्के सर्वसमावेशक योजनेतील ३३२२ सदनिकांचा आणि १५ टक्के सामाजिक गृहनिर्माण योजनेतील ८६४ सदनिकांचा सोडतीत समावेश करण्यात आला आहे. अर्जदारांच्या विनंतीनुसार, काही तांत्रिक अडचणी व निवडणूक आचारसंहिता या कारणांमुळे अर्ज भरण्यासाठी दोनदा मुदतवाढ देण्यात आली होती. ज्या अर्जदारांना प्रत्यक्ष कार्यक्रमस्थळी उपस्थित राहणे शक्य नाही, त्यांच्यासाठी म्हाडाने ऑनलाईन प्रक्षेपणाची सोय केली आहे. अर्जदारांना त्यांच्या नोंदणीकृत मोबाईल क्रमांकावर एक लिंक पाठवण्यात आली आहे. तसेच, म्हाडाच्या अधिकृत युट्युब चॅनेलवर दुपारी १२ वाजल्यापासून ही सोडत थेट पाहता येईल. जास्तीत जास्त अर्जदारांनी या पारदर्शक प्रक्रियेचा लाभ घ्यावा, असे आवाहन पुणे म्हाडा प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

# माजी सरन्यायाधीश उदय लळीत यांच्या हस्ते 'सूर्यदत्त राष्ट्रीय जीवनगौरव' पुरस्कारांचे वितरण

**पुणे । प्रतिनिधी**

समाजाच्या विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना एकाच व्यासपीठावर सन्मानित करण्याची संधी म्हणजे समाजाच्या प्रबोधनाचा प्रभावी मार्ग आहे. कला, क्रीडा, विज्ञान, अर्थशास्त्र, लेखा, प्रशासन आदी विविध क्षेत्रांतील व्यक्तींचा समावेश असलेला हा समाजाचा विविधांगी प्रेरणादायी कार्यक्रम अनुभवता आल्याचे समाधान आहे, असे प्रतिपादन सर्वोच्च न्यायालयाचे माजी सरन्यायाधीश उदय लळित यांनी केले.

सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशन संचालित सूर्यदत्त ग्रुप ऑफ इन्स्टिटयूटच्या २८ व्या वर्धापनदिनानिमित्त आयोजित 'सूर्यदत्त राष्ट्रीय जीवनगौरव पुरस्कार' व सूर्यदत्त राष्ट्रीय पुरस्कार' वितरण समारंभात उदय लळीत बोलत होते. बाणेर येथील बंटारा भवनमध्ये झालेल्या समारंभावेळी माजी केंद्रीय निवडणूक आयुक्त टी. एस.



कृष्णमूर्ती, भारतीय जनता पार्टीचे माजी राष्ट्रीय उपाध्यक्ष श्याम जाजू, एअरमार्शल (निवृत्त) भूषण गोखले, ज्येष्ठ अभिनेते रझा मुराद, एमआयटीचे अधिष्ठाता प्रा. डॉ. शरदचंद्र दराडे, 'सूर्यदत्त'चे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया, उपाध्यक्षा सुषमा चोरडिया, सहयोगी उपाध्यक्षा स्नेहल नवलखा, मुख्य कार्यकारी अधिकारी अक्षित कुशल, मुख्य विकास अधिकारी सिद्धांत चोरडिया आदी उपस्थित होते. पद्मश्री परमपूज्य आचार्य डॉ. चंदनाजी महाराज (ताई माँ) यांना 'सूर्यदत्त ग्लोबल पीस गांधीयन फिलॉसॉफी अवॉर्ड २०२६', तर माजी सरन्यायाधीश उदय लळित यांच्यासह ज्येष्ठ अभिनेते अशोक सराफ, हास्ययोग चळवळीचे विठ्ठल काटे, माजी सनदी अधिकारी शेखर गायकवाड, अभिनेते राकेश बेदी, बांधकाम व्यावसायिक विलासकुमार पालरेषा, दिग्दर्शक सुभाष सेहगल, शिक्षणतज्ज्ञ अशोककुमार ठाकूर, शास्त्रज्ञ डॉ. आनंद भाडळकर, विधिज्ञ ॲड. प्रमोद आडकर, साहित्यिका प्रा. सुरेखा कटारिया, उद्योजक प्रकाश गांधी, जागतिक रणनीतीकर संजय पुरी यांना 'सूर्यदत्त राष्ट्रीय जीवनगौरव पुरस्कार' प्रदान करण्यात आले. श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती ट्रस्टचे महेश सूर्यवंशी, योगसद्गुरू डॉ. कृष्णदेव गिरी, अभिनेत्री व स्टँडअप कॉमेडियन उपासना सिंग, भारतीय बुद्धिबळपटू ग्रँडमास्टर अभिजित कुंटे, सर्वोच्च न्यायालयातील वकील ॲड. आशुतोष श्रीवास्तव, सामाजिक कार्यकर्त्या डॉ. सुरेंद्रा कुमारी, योग प्रशिक्षक राखी गुगळे, अवकाशशास्त्रज्ञ डॉ. कनक सहा, बासरीवादक पारस नाथ, ग्लोबल युथ ॲंबेसेडर दारासिंग खुराणा, डॉ. प्रमोद त्रिपाठी, गिर्यारोहक आशिष माने यांना 'सूर्यदत्त राष्ट्रीय पुरस्कार', सीए मोहित धांड, गायिका प्रीती दवे व पिंकी दवे, जलतरणपटू हातवी शहा यांना 'सूर्यदत्त नॅशनल यंग अचिव्हर अवॉर्ड', तर मास्टर ऋषी शिव प्रसन्न आणि मास्टर राघव मालपाणी यांना 'सूर्यदत्त लिट्ल मास्टर नॅशनल अवॉर्ड' देण्यात आला.

# झेडपी निवडणुकीत अजित दादांच्या राष्ट्रवादीचा मोठा विजय, पुण्यातही सर्वाधिक जागा

**पुणे । प्रतिनिधी**

राज्यातील १२ जिल्हा परिषद (नझ शश्रशलींळेप) आणि १२५ पंचायत समितीच्या निवडणुकांमध्ये पुन्हा एकदा भाजपचं कमळ खुललं आहे. भाजपने जिल्हा परिषद आणि पंचायत समितीत सर्वाधिक जागा जिंकत विजयी घोडदौड कायम ठेवली आहे. मात्र, कायमच ग्रामीण महाराष्ट्रातील त्यातचही पश्चिम महाराष्ट्रातील ग्रामीण भागात वरचष्मा राहिलेल्या राष्ट्रवादी काँग्रेसनेही कमालीचं कमबॅक केलं आहे. राष्ट्रवादीने दुसऱ्या क्रमांकावर सर्वाधिक जागा जिंकत दिवंगत अजित पवारांची ग्रामीण भागातील पकड पुन्हा एकदा सिद्ध केली. दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येत ही निवडणूक लढवण्यात आली. त्यामध्ये, पुणे आणि कोल्हापूर जिल्ह्यात मोठं यश राष्ट्रवादीला मिळालं आहे. राष्ट्रवादीच्या या विजयानंतर प्रतिक्रिया देताना नेतेमंडळी अजित पवारांची आठवण काढत भावुक होत आहेत. या निकालानंतर राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनीही आपली प्रतिक्रिया दिली.

जिल्हा परिषद निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसने दुसऱ्या क्रमांकावर सर्वाधिक जागा जिंकल्या असून आत्तापर्यंतच्या आकडेवारीनुसार राष्ट्रवादीने जिल्हा परिषदेच्या १७२ जागा जिंकल्या असून पुणे जिल्ह्यात जवळपास ४४ जागांवर विजय मिळवला आहे. या विजयानंतर कार्यकर्त्यांनी अजित पवारांच्या फोटोसह जल्लोष केला. तर, काहींचा दादांच्या आठवणीने कंठ



दाटल्याचंही पाहायला मिळालं. पुणे जिल्हा परिषदेच्या ७४ जागांसाठी ही निवडणूक होत असून येथे राष्ट्रवादी काँग्रेसने सर्वाधिक ४० पेक्षा जागा जिंकत पक्षाचं वर्चस्व सिद्ध केलंय. विशेष म्हणजे पुणे आणि पिंपरी चिंचवड महापालिका निवडणुकीत मोठ्या पराभवाचा सामना राष्ट्रवादी काँग्रेसला करावा लागला होता. त्यामुळे, जिल्हा परिषद निवडणुकीत येथील जनता राष्ट्रवादीला किती स्वीकारेल हाही प्रश्न होता. मात्र, राष्ट्रवादीचं कमबॅक राष्ट्रवादीच अस्तित्व सिद्ध करणारं आहे. मात्र, राष्ट्रवादीचं हे यश पाहायला पक्षाचे माजी राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार नाहीत याचं दुःख सर्वांनाच आहे. या निकालावर सुनिल तटकरे यांनी प्रतिक्रिया देत हा निकाल अजित दादांच्या विचारांवरील अढळ श्रद्धा असल्याचं त्यांनी म्हटलं.

''आज जाहीर झालेले जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणुकीचे निकाल म्हणजे राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री, आमचे नेते मा.श्री. अजितदादा पवार यांच्या कार्याला आणि त्यांच्या अविरत परिश्रमांना जनतेने कृतज्ञतापूर्वक अर्पण केलेली आदरांजली आहे. मा. अजितदादांनी आयुष्यभर तळागाळातील माणसासाठी झटत विकासाला गती दिली. आजचा हा निकाल म्हणजे त्यांच्या विचारांवरील, त्यांच्या नेतृत्वावरील अढळ श्रद्धेची साक्ष आहे. या माध्यमातून दादांचा वारसा जपत अधिक जबाबदारीने आणि प्रामाणिकपणे जनतेची सेवा करण्याचा आमचा संकल्प अधिक दृढ झाला आहे,'' अशी प्रतिक्रिया सुनील तटकरे यांनी ट्विटरवरुन दिली आहे.

# बारामतीत जिल्हा परिषदेच्या सहाही जागा राष्ट्रवादीकडे

**बारामती । प्रतिनिधी**

बारामती तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या सहा गटांतील सर्व जागा दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने पटकाविल्या. भाजपने येथे चार जागी उमेदवार उभे केले होते. परंतु, त्यांना मोठ्या पराभवाला सामोरे जावे लागले. याशिवाय बहुजन समाज पक्षालाही कोणताही करिश्मा दाखवता आला नाही. पंचायत समितीच्या १२ पैकी २ जागा राष्ट्रवादीने भाजपला सोडल्या होत्या. त्यामुळे पंचायत समितीत राष्ट्रवादीला १२ पैकी १० व भाजपला दोन जागा मिळाल्या.



दोन्ही राष्ट्रवादी जिल्हा परिषद-पंचायत समिती निवडणुकीसाठी बारामतीत एकत्रित लढल्या. राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाला एकही जागा दिली गेली नव्हती. परंतु, त्यांचा पक्ष अजित पवार यांच्या पक्षासोबत होता. या निवडणुकीत दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादीला मतदारांनी भरभरून साथ दिली. सुपा गटामध्ये राष्ट्रवादीच्या पल्लवी प्रमोद खेत्रे ह्या १४,५५३ मताधिक्याने विजयी झाल्या. त्यांना १८,०९५ मते मिळाली. अपक्ष उमेदवार मोहिनी गणेश खैरे यांना ३,५४२ मते मिळाली. भाजपच्या वंदना विशाल कोकरे येथे तिसऱ्या स्थानी राहिल्या. त्यांना २,६७७ मते मिळाली. गुणवडी गटामध्ये राष्ट्रवादीच्या शुभांगी कचेर शिंदे १७,२४९ मतांनी विजयी झाल्या. शिंदे यांना १८,४५३ मते मिळाली, तर पराभूत बसपच्या ऊर्मिला प्रवीण शिंदे यांना १,२०४ मते मिळाली. पणदरे गटातून राष्ट्रवादीचे मंगेश प्रतापराव जगताप हे १७,५३६ मतांनी विजयी झाले. जगताप यांना २०,८०० मते मिळाली, तर त्यांचे प्रतिस्पर्धी भाजपचे सुरज अरविंद जगताप यांना ३,२६४ मते मिळाली.

वडगाव निंबाळकर गटातून राष्ट्रवादीच्या रोहिणी संदीप कदम (ढोले) ह्या २१,५३६ मतांनी विजयी झाल्या. रोहिणी कदम यांना २२,५७२ मते मिळाली. त्यांच्या प्रतिस्पर्धी भाजपच्या पराभूत उमेदवार आरती मधुकर लोखंडे यांना १,०३६ मते मिळाली. निंबुत गटातून राष्ट्रवादीचे करण संभाजीराव खलाटे हे १९,५२४ मतांनी विजयी झाले. खलाटे यांना २२,१८१ मते मिळाली. त्यांचे प्रतिस्पर्धी पराभूत भाजप उमेदवार दिग्विजय वसंतराव काकडे यांना २,६५७ मते मिळाली. निरावागज गटातून राष्ट्रवादीच्या शिवानी अभिजित देवकाते ह्या २०,५४४ मतांनी विजयी झाल्या. देवकाते यांना २१,६१३ मते मिळाली. त्यांचे प्रतिस्पर्धी पराभूत अपक्ष उमेदवार रोहित राजू भोसले यांना १,०६९ मते मिळाली.

पंचायत समितीतही राष्ट्रवादी बारामती पंचायत समितीच्या १२ जागांपैकी १० जागा दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादीला मिळाल्या. निवडणुकीपूर्वी राष्ट्रवादीने भाजपसाठी सुपे व शिर्सुफळ गणातील दोन जागा सोडत तेथे उमेदवार दिले नव्हते. त्या जागा भाजपच्या पदरात पडल्या. यानिमित्ताने अनेक वर्षांनंतर बारामतीत भाजपच्या चिन्हावरील उमेदवार विजयी झाले. अन्य दहा ठिकाणी मात्र राष्ट्रवादीने एकतर्फी विजय मिळविला.



## सिंहगडावर पर्यटकांची मोठी गर्दी; एका दिवसात ८० हजारांहून अधिक शुल्क जमा

**पुणे । प्रतिनिधी**

सिंहगड किल्ल्यावर वाहनाने येणाऱ्या पर्यटकांकडून रविवारी (दि.८) दिवसभरात वनविभागाच्या वतीने ८० हजार १५० रुपयांचा उपद्रव शुल्क जमा करण्यात आला. सुट्टीच्या दिवसाचा आनंद घेण्यासाठी पर्यटकांनी सिंहगड, राजगडसह खडकवासला, पानशेत आदी पर्यटन स्थळांकडे धाव घेतली.

किल्ले सिंहगडावर वनविभागाच्या वतीने गोळेवाडी नाका, कोंढणपूर फाटा येथे वनविभागाचे सुरक्षा रक्षकांनी थांबून योग्य वाहतूक नियोजन केल्याने पर्यटकांची गर्दीतून सुटका झाली. सिंहगडाचे वनपरिमंडळ अधिकारी समाधान पाटील, वनरक्षक बळीराम वायकर, नितीन गोळे आदींसह सुरक्षारक्षक तैनात होते. रविवारी दिवसभरात गडावर पर्यटकांची दुचाकी ८३५ व चारचाकी ३८२ वाहने गेली. दुपारी पर्यटकांची संख्या वाढली. त्यामुळे घाट रस्त्यावर काही काळ वाहतूक बंद करण्यात आली. गडावरून खाली येणाऱ्या वाहनांच्या प्रमाणात वाहने गडावर सोडण्यात आली.

# येरवडा पोलिस ठाण्यातून पसार झालेल्या आरोपीला बेड्या

**पुणे । प्रतिनिधी**

येरवडा पोलिस ठाण्याच्या आवारातील कोठडीतून (लॉकअप) पसार झालेल्या आरोपीला पोलिसांनी बेड्या ठोकल्या. लॉकअपमधील स्वच्छतागृहातील काचा उचकटून आरोपी पसार झाला. पोलिसांनी तातडीने तपास करून पसार आरोपीला येरवड्यातून अटक केली. शैलेश राजू मोहिते (वय १९, रा. कामराजनगर, येरवडा) असे अटक केलेल्याचे नाव आहे. याबाबत पोलिस उपनिरीक्षक किशोर बेरड यांनी येरवडा पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी मोहिते याला अल्पवयीन युवतीवर बलात्कार, तसेच बालकांचे लैंगिक अत्याचारांपासून प्रतिबंधक कायद्यान्वये (पोक्सो) गुन्हा दाखल करून त्याला ५ फेब्रुवारी रोजी अटक केली होती. न्यायालयाने त्याला कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले होते. रविवारी (दि.८ फेब्रुवारी) सायंकाळी साडेसातच्या सुमारास मोहितेने कोठडीत अंथरण्यासाठी चादर हवी आहे, असा बहाणा केला. त्यानंतर पोलिस कर्मचाऱ्यांचे लक्ष चुकवून तो स्वच्छतागृहात केला. स्वच्छतागृहातील खिडकीच्या काचा सरकवून उतरला आणि पसार झाला. काही वेळानंतर मोहिते पसार झाल्याचे लक्षात आल्यानंतर पोलिसांनी तातडीने तपास सुरू केला. वरिष्ठ पोलिस निरीक्षक अंजुम बागवान यांच्या मार्गदर्शनाखाली तपास पथकाने मोहिते याला येरवडा परिसरातून रात्री दहाच्या सुमारास अटक केली. पोलिस उपनिरीक्षक महेश फटांगरे तपास करत आहेत.

# मुळशी तालुक्यात राष्ट्रवादीचे वर्चस्व

**मुळशी । प्रतिनिधी**

मुळशी तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या तीन जागांपैकी दोन जागांवर राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार)ने विजय मिळविला. एका जागेवर भाजपचा उमेदवार विजयी झाला. पंचायत समितीत सहापैकी तीन जागा राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार)ला, तर दोन जागा राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाला मिळाल्या. भाजपला एका जागेवर समाधान मानावे लागले.



मुळशी तालुक्यात जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीत पौड-अबंडवेट जिल्हा परिषद गटातून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे मिलिंद नंदकुमार वाळंज हे ५२९७ मतांनी विजयी झाले. त्यांनी शिवसेना (उबाठा) उमेदवार अविनाश बलकवडे यांचा पराभव केला. राष्ट्रवादी काँग्रेसचे मिलिंद वाळंज यांना १७,९५९, तर शिवसेनेचे अविनाश बलकवडे यांना १२,६६२ मते मिळाली.

पौड पंचायत समिती गणातून राष्ट्रवादी काँग्रेसच्या काजल अंकुश मोरे या विजयी झाल्या. त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या कोमल वाशिवले यांचा २१४५ मतांनी पराभव केला. काजल मोरे यांना ६१४७ मते मिळाली, तर कोमल वाशिवले यांना ४००२ मते मिळाली. अबंडवेट पंचायत समिती गणातून राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रवीण धनवे यांनी शिवसेना (उबाठा) उमेदवार सचिन खैरे यांचा १७७६ मतांनी पराभव केला. प्रवीण धनवे यांना ८५४७ मते मिळाली, तर सचिन खैरे यांना ६७७१ मते मिळाली.

माण-हिंजवडी जिल्हा परिषद गटातून भारतीय जनता पार्टीचे शिवाजी बुचडे यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे सागर साखरे यांचा १९६७ मतांनी पराभव केला. शिवाजी बुचडे यांना १७,९०५ मते मिळाली, तर सागर साखरे यांना १५,९३८ मते मिळाली.

माण पंचायत समिती गणातून राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवार मंदा शेळके यांनी भाजपा पुरस्कृत उमेदवार रूपाली बोडके यांचा २३१० मतांनी पराभव केला. मंदा शेळके यांना ५९८१ मते मिळाली, तर रूपाली बोडके यांना ३६७१ मते मिळाली. हिंजवडी पंचायत समिती गणातून भारतीय जनता पार्टीच्या ऐश्वर्या वाघमारे यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या निकीता वाघमारे यांचा १३२२ मतांनी पराभव केला. ऐश्वर्या वाघमारे यांना १०१२१ मते मिळाली, तर निकिता वाघमारे यांना ८७९९ मते मिळाली.पिरंगुट-भूगाव जिल्हा परिषद गटातून राष्ट्रवादी काँग्रेस उमेदवार शांताराम इंगवले यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे महादेव कोंढरे यांचा १३८४ मतांनी पराभव केला. शांताराम इंगवले यांना ११,१४१ मते मिळाली, तर महादेव कोंढरे यांना ९,७५७ मते मिळाली. पिरंगुट पंचायत समिती गणातून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे राहुल पवळे यांनी शिवसेना (उबाठा) उमेदवार रामदास गोळे यांचा ३६३ मतांनी पराभव केला. राहुल पवळे यांना ३७४१ मते मिळाली, तर रामदास गोळे यांना ३३७८ मते मिळाली. भूगाव पंचायत समिती गणातून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे दगडूकाका करंजावणे यांनी शिवसेना (उबाठा) उमेदवार अनिल पवार यांचा ४३८ मतांनी पराभव केला. दगडूकाका करंजावणे यांना ६७३२ मते मिळाली, तर अनिल पवार यांना ६२९४ मते मिळाली.

# पुण्यात अक्षरांचा उत्सव.! विश्वास पाटील यांच्या हस्ते दोन दिवसीय साहित्यिक महोत्सवाचे दिमाखदार उद्घाटन

**पुणे । पतिनिधी**

मराठी भाषा आणि साहित्याच्या समृद्ध परंपरेचा जागर करत, पुण्यात आयोजित करण्यात आलेला दोन दिवसांचा साहित्यिक महोत्सव अत्यंत उत्साहात पार पडला. ९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष विश्वास पाटीलयांच्या हस्ते दीपप्रज्वलन आणि ग्रंथप्रदर्शनाचे उद्घाटन करून या महोत्सवाची सुरुवात झाली. पुण्यातील नांदेड सिटीमधील मंगलभैरव सोसायटी आयोजित 'पुस्तकमैत्री' महोत्सव आयोजित केला होता. यंदा कार्यक्रमाचे तिसरे वर्ष होते.

या सोहळ्याला प्रमुख पाहुणे म्हणून प्रसिद्ध लेखक नितीन थोरात, लेखक-कवी देवा झिंजाड, अभिषेक अवचार, राजेश मंडलिका, प्रियंका चौधरी आणि उद्योजक सोनम सूर्यवंशी (आर्यन ज्वेलर्स) राहुल पोकळे आणि अविनाश लगड (युथ फाउंडेशन चे अध्यक्ष) यांची उपस्थिती होती. उद्घाटनप्रसंगी बोलताना विश्वास पाटील यांनी मराठी साहित्याची जपवणूक आणि वाचन संस्कृती वाढवण्यावर भर दिला. पहिल्या दिवशी घोषवाक्य आणि पारंपारिक वेशभूषा स्पर्धांनी रंगत आणली. तर दुसऱ्या दिवशी चित्रकला, वक्तृत्व आणि मराठी साहित्यावर आधारित वक्तृत्व स्पर्धा आणि प्रश्नमंजुषा पार पडली. तर संजय ऐलवाड यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बालकवी संमेलनात लहानग्यांच्या कवितांनी उपस्थितांची मने जिंकली. सायंकाळी



गीतगायन, सांगीतिक जुगलबंदी आणि बालनाट्य प्रयोगांनी कार्यक्रमात चैतन्य भरले. महोत्सवाचा दुसरा दिवस कवी संमेलनाने विशेष गाजला. सागर रामचंद्र काकडे यांच्या हस्ते उद्घाटन झालेल्या या संमेलनात महाराष्ट्रातील नामवंत कवी नीलेश खडके, श्वेता बरकडे, गिरीश जंगमे, दिनेश कांबळे, वैभव जावळे, सुरेश धोत्रे, अतुल दुधाने आणि कुमार चव्हाण यांनी आपल्या दर्जेदार कविता सादर केल्या. रात्री १० वाजता सामूहिक 'पसायदान' म्हणून या महोत्सवाचा समारोप झाला. या भव्य उपक्रमाचे मुख्य प्रायोजक बन्सल क्लासेस (इरपीरश्र उश्ररींशी) हे होते, तर आर्यन ज्वेलर्स यांनी सह-प्रायोजक म्हणून मोलाची भूमिका बजावली. या महोत्सवाला साहित्यप्रेमींचा आणि सभासदांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून, मराठी भाषेच्या संवर्धनासाठी हा उपक्रम मैलाचा दगड ठरला आहे.

माझं पाखरू' नाटकाचा प्रयोग

'माझं पाखरू' या नाटकाचा विशेष प्रयोग सादर करण्यात आला, ज्याला प्रेक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या सोहळ्याचे आणखी एक आकर्षण म्हणजे आयोजित केलेले 'कवी संमेलन'. या संमेलनाचे वैशिष्ट्य म्हणजे यात लहान मुलांपासून ते थोरामोठ्यांपर्यंत, सर्व वयोगटातील कवींनी सहभाग नोंदवला होता. सहभागी कवींनी आपल्या कवितांमधून विविध विषयांवर भाष्य करत उपस्थितांची मने जिंकली.